www.yuvakadhar.in    E mail - dainikyuvakaadhar@gmail.com    facebook : yuvakadhar

दैनिक **युवक आधार** तरुणांचा बुलंद आवाज मराठी

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 238 वा मंगळवार दि. १३ मे २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## पल्स मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे उद्घाटन आमदार महेश बालदी यांच्या हस्ते

### रसायनीकरांनी शुभेच्छा देण्यासाठी केली मोठी गर्दी..

**दैनिक युवक आधार**
**रसायनी वार्ताहर**

पाताळगंगा येथील रसायनी परिसरात अनेक वर्षापासून वैद्यकीय सेवा क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणारे डॉ. सागर कांबळे व डॉ. परिणीता वानखडे यांच्या रसायन येथील पल्स मल्टी स्पेशलिस्ट हॉस्पिटलच्या नव्याने उभारण्यात आलेल्या वैद्यकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण अत्याधुनिक सेवा सुविधा उपलब्ध असलेल्या भव्य दिव्य इमारतीचे उद्घाटन भगवान गौतम बुद्ध जयंती निमित्त 12 मे रोजी वासंबे ग्रामपंचायत सरपंचा उमाताई मुंढे, माजी सरपंच संदीप मुंढे, पतंजली जनरल मॅनेजर संजीव भनोट, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर, इसरो अधिकारी एस एम भांडारे, डॉ.दीपक कुलकर्णी या प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत आमदार महेश बालदी यांच्या हस्ते झाले. यावेळी पल्स मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या संपूर्ण व्यवस्थापन टीम ने हॉस्पिटल साठी व्हील चेअर भेट म्हणून दिली . रसायनीकरांनी सदैव तत्पर वैद्यकीय सेवा देण्यासाठी अहोरात्र सेवा देणाऱ्या प्लस हॉस्पिटल डॉ.कांबळे व वानखडे यांना शुभेच्छा देण्यासाठी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. वैद्यकीय सेवा,सुविधा उत्तम स्तरावर दर्जात्मक देण्यासाठी रसायनीतील विश्वासनिय ठिकाण म्हणून पतंजली जनरल मॅनेजर संजीव भनोट यांनी देवीची मूर्ती भेट म्हणून दिली. पल्स हॉस्पिटल तर्फे सहकार्य, साथ देणाऱ्या सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार मानण्यात आले.




# नागपूरच्या ठकसेनाला अखेर अटक,

## कांदिवलीच्या व्यापाऱ्याची २६ लाखांची फसवणूक

मुंबई – व्यापाऱ्याची फसवणूक करणाऱ्या साई अग्रीम कॉर्पोरेशन या कंपनीच्या राहुल जैन याच्याविरोधात आणखी एक फसणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी जैन यांनी कांदीवली येथील एका व्यापाऱ्याला शंभर टन माल न देता २६ लाख रुपयांची फसवणूक केली आहे. कांदिवली पोलिसांनी नुकतीच जैन याला अटक केली आहे. तक्रारदार हार्दीक शहा हे कांदिवलीत राहतात. त्यांची बीडीएफ इंटरनॅशनल एलएलपी नावाची कंपनी आहे. ते जीवनावश्यक वस्तू पुरविण्याचे काम करतात. ३१ जुलै २०२४ रोजी शहा यांना एसएलबी इथेन नलॉन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीकडून २ हजार मेट्रीक टन मक्याचे दाणे पुरविण्याचे कंत्राट मिळाले होते. त्यासाठी शहा यांनी नागपूरच्या साई अग्रीम कॉर्पोरेशन या कंपनीशी संपर्क साधला होता. कंपनीचा मालक राहुल जैन याने २०० टन मक्याचे दाणे देण्याचे आश्वासन दिले. हा करार ५२ लाखांना ठरला होता. त्यानुसार हार्दीक शहा यांनी जैन याला पहिल्या शंभर टनासाठी २४ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट या कालावधीत २७ लाख २६ हजार रुपये दिले. जैन यांनी तक्रारदार शहा यांना १०० टन मक्याचे दाणे पुरवले. त्यामुळे शहा यांचा जैन यांच्यावर विश्वास बसला होता.
त्यामुळे पुढील शंभर टन मालासाठी ३१ ऑगस्ट २०२४ ते ९ सप्टेंबर २०२४ या




कालावधीत शहा यांनी जैन याला २७ लाख ७९ हजार रुपये दिले. मात्र जैन याने ठरल्यानुसार माल न देता टाळाटाळ केली. विविध कारणे देत तो शहा यांना टाळू लागला. या काळात हार्दीक शहा यांना धनादेश देऊन वेळ मारून नेली. पंरतु ते धनादेश देखील वटले नाहीत. २४ ऑगस्ट २०२०४ ते १९ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत २६ लाख ७९ हजार रुपये घेऊन माल पुरवला नाही आणि फसवणूक केली. दरम्यान, राहुल जैन याच्या विरोधात अन्य पोलीस ठाण्यात फसवणुकीचे गुन्हे दाखल असल्याची माहिती शहा यांना मिळाली. त्यामुळे शहा यांनी त कांदिवली पोलिसांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. राहुल जैन विरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१६ (२) आणि ३१८ (४) अन्वये फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. नुकतेच त्याला अटक करण्यात आले. दोन दिवसांच्या पोलीस कोठडीनंतर जैन याची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे.आरोपी जैन याने अनेक व्यापाऱ्याची फसवणूक केली आहे. त्याची कसून चौकशी होणे आवश्यक आहे असे तक्रारदार हार्दीक शहा यांनी सांगितले.

## अलोरे येथील बौद्धविहाराचे उद्घाटन समारंभ आमदार शेखर निकम यांच्या हस्ते संपन्न

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार**

**चिपळूण प्रतिनिधी**– अलोरे बौद्धवाडीतील नव्याने बांधण्यात आलेल्या बौद्धविहाराचे उद्घाटन आमदार शेखर निकम यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडले. विहारासाठी आमदार निकम यांनी व अतिशय चांगल्या प्रकारचा निधी मंजूर करून दिला होता. या उद्घाटनप्रसंगी आमदार निकम यांनी उपस्थित ग्रामस्थांशी संवाद साधत, विकासकामांबाबत आपल्या कटिबद्धतेचा पुनरुच्चार केला. ग्रामपातळीवरील सुविधांचा विस्तार हा शासनाचा उद्देश असून, त्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून आपण नेहमी पुढे राहणार असल्याचे ते म्हणाले. तसेच येणाऱ्या काळात भविष्यात समाजाच्या प्रगतीसाठी व मुलांच्या शिक्षणासाठी कायम कटिबद्ध असल्याचे सांगितले. उद्घाटन सोहळ्याला प्रदेश प्रतिनिधी शौकतभाई मुकादम, विधानसभा अध्यक्ष रमेशजी राणे, विनोदजी झगडे, अशोकभाई कदम, युवक अध्यक्ष निलेश कदम, मूयुरजी खेतले,मनोहरजी मोहिते, राजुजी जाधव, श्रीधर जाधव, मनीषा जाधव, रिया कांबळे, राकेश जाधव, तुषार चव्हाण, विकासजी गमरे, अविनाश कोलगे, प्रसाद लाड, राजेश चव्हाण, सुरेश कदम, दत्ता बंगाल, कृष्णा बंगाल, देवा मोहिते, मुकुंद जाधव, अशोक मोहिते, अमोल जाधव, गौतम जाधव, निशिकांत जाधव, प्रकाश जाधव, वैभव जाधव, यांच्यासह अनेक पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या नविन विहाराच्या उभारणीमुळे गावात विविध सामाजिक, सांस्कृतिक व शासकीय उपक्रम राबविण्यासाठी एक हक्काचं व्यासपीठ उपलब्ध झाल्याने ग्रामस्थांत आनंदाचे वातावरण आहे.




# दहावीचा निकाल आज १ वाजता होणार जाहीर

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**

राज्यात बारावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर सगळ्यांच्याच नजरा दहावीच्या निकालाकडे लागल्या आहेत. दहावीच्या निकालाची सगळ्यांनाच प्रतीक्षा आहे. एकीकडे सगळ्या बोर्डाचे निकाल जाहीर आहेत. या दरम्यान आता महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा निकाल कधी लागणार, याची अपडेट समोर आली आहे. आज म्हणजेच १३ मे रोजी १० वीचा निकाल जाहीर होणार आहे.
यंदा १६ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली आहे. या परीक्षेसाठी राज्यातील २३ हजार ४९२ माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यानंतर विद्यार्थ्यासमोबतच पालकही निकालाची वाट पाहत होते, मात्र ही प्रतीक्षा अखेर संपली आहे. महाराष्ट्र बोर्डाच्या दहावी परीक्षेचा निकाल आज अधिकृत संकेत स्थळावर दुपारी १ वाजता पाहता येणार आहे. १ वाजता विद्यार्थ्यांना बोर्डाच्या आणि अन्य संकेतस्थळांवर आपला निकाल पाहता येईल. त्यानंतर आपापल्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना गुणपत्रिकांचे वाटप करण्यात येईल.
जेव्हा निकाल खरोखरीच जाहीर होईल तेव्हा साहजिकच एकाच वेळी साईटवर लोड आल्याने क्रॅश होण्याची शक्यता असते. अशावेळी तुम्ही आपल्या मोबाईल फोनवर सगळ्यात आधी अपडेट्स मिळवण्यासाठी खालील स्टेप्स फॉलो करू शकता.

**अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन**

दहावीची निकाल लागल्यानंतर विद्यार्थी आणि पालक यांची अकरावीच्या प्रवेशासाठी अनेक कॉलेजच्या खेटी घालाव्या लागतात. विद्यार्थी आणि पालक यांची गैरसोय टाळण्यासाठी महाराष्ट्र बोर्डानं महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र बोर्डानं यंदा अकरावीची संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीनं करण्याचा निर्णय घेतल आहे. याबाबची माहिती बोर्डानं एक प्रसिद्धीपत्रक जारी करून यापूर्वीच दिली आहे.

**महाराष्ट्र बोर्ड 10 वी निकाल 2025 : निकाल साईटवर कसा तपासायचा?**

https://results.digilocker.gov.in
https://sscresult.mahahsscboard.in
http://sscresult.mkcl.org
https://results.targetpublications.org

**महाराष्ट्र बोर्ड 10वी निकाल 2025: मोबाईलवर SMS मध्ये कसा समजेल निकाल?**

दहावीच्या विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना आपल्या मोबाइलवरुन देखील दहावीचा निकाल पाहता येणार आहे. अनेकदा निकालाच्या वेळेस वेबसाइट या क्रॅश होतात किंवा इंटरनेट उपलब्ध नसेल तर SSC निकाल हा त्यांना SMS द्वारे पाहाता येणार आहे.
SMS द्वारे एसएससीचा निकाल पाहण्यासाठी विद्यार्थ्यांना "MHSSC" असं टाकून 57766 वर SMS पाठवायचा आहे. त्यानंतर निकाल त्यांच्या फोनवर

# कर्मवीर अण्णांची भूमी आणि छत्रपती शिवाजी कॉलेज माझ्यासाठी पंढरी - लोकनेते रामशेठ ठाकूर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

कितीही मोठे झालो तरी जुन्या दिवसांचा विस्मरण होऊ नये कारण तेच दिवस आपल्या आयुष्यातील महत्वाचे दिवस असतात, त्यामुळे कर्मवीर अण्णांची शिकवण असलेली हि भूमी आणि छत्रपती शिवाजी कॉलेज माझ्यासाठी पंढरी आहे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सातारा येथे केले. रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून छत्रपती शिवाजी कॉलेजच्या कमवा व शिका योजना माजी विद्यार्थी स्नेहमेळावा छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथे माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा रयत शिक्षण संस्थेच्या विकासात मौल्यवान वाटा राहिला आहे. त्यांनी या संस्थेच्या कमवा व शिका योजनेत शिक्षण घेतले. नेहमीच माजी विद्यार्थी म्हणून रयत शिक्षण संस्थेचा आदर उराशी बाळगून आहेत. त्यामुळे यावेळी कमवा व शिका योजनेतील माजी विद्यार्थ्यांकडून त्यांच्याप्रती आदर व्यक्त करण्यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्याचा उल्लेख असलेला मानपत्र आणि मायेची शाल देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी मानपत्राचे वाचन होत असताना वातावरण अतिशय अभिमानाने ऊर भरून येणारे होते. टाळ्यांच्या कडकडाट त्याला माजी विद्यार्थ्यांकडून प्रतिसाद दिला जात होता. या कार्यक्रमाला रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, शहाजी डोंगरे, माजी प्राचार्य आर. के. शिंदे, कमवा व शिका योजनेचे चेअरमन श्री. देशमुख, माजी उपाध्यक्ष एम. एस. शिंदे, जे. पी. धायगुडे, प्राचार्य राजेंद्र मोरे. धनाजी लेंडवे यांच्यासह माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुढे बोलताना सांगितले की, ज्या वर्गात मी शिकलो त्या वर्गात माझा सत्कार होत आहे, याचा मला अभिमान आहे. कर्मवीर अण्णांनी जात पात धर्म पंथ न मानता बहुजन समाजाला शिक्षित केले. माणुसकीचा धर्म कर्मवीर अण्णांनी शिकवणीतून दिला तसेच शाहू फुले आंबेडकरांची शिकवण अण्णांनी रुजवली, असे त्यांनी अधोरेखित केले. मी कमवा व शिका योजनेत शिकलो त्यामुळे येथील अनेक आठवणी आहेत. छत्रपती शिवाजी कॉलेज माझा जीव कि प्राण आहे. गरिबीत काढलेले दिवस आजही आठवणीत आहेत, जीवनात भरपूर कमावले पण गरजुंना देण्याची सवय माझी कधीही जाणार नाही. माझ्या जे काही आहे ते देण्याचा मी प्रयत्न करतो. कर्मवीर अण्णांची विद्यापीठ करण्याची इच्छा होती आणि ती पूर्ण करण्यासाठी हातभार लावता आला याचा मला आनंद आहे, असेही त्यांनी नमूद केले. त्यांनी पुढे बोलताना, त्या काळचे शिक्षक शिस्तीने कडक पण तेवढेच मनमिळावू असल्याचे सांगत सर्व शिक्षकांप्रती आपली आदरभावना व्यक्त केली तसेच बालपणीच्या आठवणीत कधीही खंड पाडू नका असे आवाहन करत माजी सहकाऱ्यांना भेटून आनंद झाल्याची भावनाही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य राजेंद्र मोरे यांनी केले.






# तर कारवाई विरोधात जनआंदोलन होणार - ग्रामस्थांची भूमिका

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**

न्हावे खाडी परिसरात पंचक्रोशीतील नागरिकांसाठी उभारण्यात आलेली निसर्गरम्य आणि देखणी रामबाग आता सिडकोच्या कारवाईच्या छायेत सापडली आहे. काही लोकांच्या व्यक्तिगत स्वार्थासाठी हि बाग उध्वस्त करण्याचा घाट सिडकोकडून घातला जात असल्याची माहिती मिळाली आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली असून त्यांनी या कारवाईला तीव्र विरोध करण्याचा आणि वेळ पडल्यास जनआंदोलन उभारण्याचा ठाम निर्णय घेतला आहे. चिखलात जसे कमळ फुलावे त्याप्रमाणे न्हावे खाडीमध्ये पंचक्रोशीतील नागरिकांसाठी सुंदर आणि निसर्गरम्य उभारली गेली आहे. मात्र काही लोकांच्या वैयक्तिक कारणासाठी रामबागेवर तोडक कारवाई करण्याचे संकेत मिळाल्याने या कारवाईला प्रखर विरोध करण्याचा ठाम निर्णय न्हावे व गव्हाण विभागातील ग्रामस्थांनी घेतला असून तसा पुकार त्यांनी दिला आहे. लोकांच्या हितासाठी उभारलेली रामबाग अबाधित रहावी यासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घेतला आहे. त्यामुळे शेकडो ग्रामस्थांनी लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेऊन तोडक कारवाई थांबवावी अशी विनंती वजा मागणी केली आहे. यावेळी ग्रामस्थांची आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सोबत झालेल्या बैठकीत आमदार प्रशांत ठाकूर यांनी ग्रामस्थ जो निर्णय घेतील त्या निर्णयाच्या पाठीशी असल्याचे जाहीर केले. यावेळी न्हावे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच हरेश्वर म्हात्रे यांनी बोलताना सांगितले कि, विमानतळ, इमारती व इतर प्रकल्प बांधण्यासाठी सीआरझेडचे नियम सिडको पायदळी तुडवते. मात्र या ठिकाणी नियमाचा फार्स करून विशेषतः व्यक्तिगत राग काढण्याचा न्यायालयात आणि सिडकोत जाण्याचा प्रयत्न झाला आहे. त्यामुळे रामबागेला सिडकोकडून नोटीस मिळाली. बागेवर कारवाई करण्यासाठी काहींची धडपड सुरु आहे. मात्र रामबाग परिसराचे वैभव आहे आणि त्यावर कुठलीही कारवाई होऊ नये यासाठी आम्ही ग्रामस्थ एकत्र आलो आहोत. रामबाग आहे त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे बांधकाम नाही तर बगीचा आणि शौचालय आहे. लोकांसाठी असलेली हि बाग आहे आणि त्यासाठी येथे कुठलेही तिकीट नाही विनाशुल्क या बागेचा राज्यभरातील पर्यटक आनंद घेत आहेत. या ठिकाणी असलेली विविध प्रकारची झाडे समुद्र किनारा आणि निसर्गाला पूरक आहेत. हि बाग लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी परिसराच्या वैभवासाठी आणि लोकांसाठी बांधली आहे त्यामुळे त्यावर ग्रामस्थांचा अधिकार राहिला आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. पुढे बोलताना या बागेचे संरक्षण आणि विकास सिडकोने किंवा ग्रामपंचायतीने करण्याची मागणी आमदार महेश बालदी यांनी ग्रामस्थांच्या मागणीवरून यापूर्वीच सिडकोकडे केली आहे. असेही यावेळी त्यांनी नमूद केले. या बैठकीला आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, नेरे मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, माजी पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, न्हावे ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच सागर ठाकूर यांच्यासह पंचक्रोशीतील लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ शेकडोंच्या संख्येने उपस्थित होते.






रामबाग अतिशय सुंदर आणि लोकांची बाग आहे. या ठिकाणी लहानग्यांपासून वृद्धापर्यंत हजारोच्या संख्येने लोक निसर्गाचा आनंद घेत असतात. आणि हि लोकांची संपत्ती हिरावून घेण्याची धमकी सिडको देत आहे. त्यामुळे ग्रामस्थांनी प्रखर विरोध करण्याचा निर्णय घेतला आहे. तोडकी कारवाई होऊ नये यासाठी वेळ पडल्यास १९८४ प्रमाणे लढा देण्याचा निर्धारही केला आहे.

**- ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत**

चिखलाळ भरलेल्या खाडी परिसरात जसे कमळ फुलते, तशीच ही रामबाग फुलवली गेली आहे. स्थानिक नागरिकांसाठी हा परिसर फक्त एक बाग नसून निसर्गाशी जोडणारा प्राणवायू केंद्र आहे. मात्र, काही व्यक्तींच्या वैयक्तिक कारणांसाठी या बागेवर सिडकोकडून तोडक कारवाई करण्याचे संकेत मिळत आहेत, जे ग्रामस्थांना कोणत्याही परिस्थितीत मान्य नाहीत. न्हावे व गव्हाण विभागातील ग्रामस्थांनी एकत्र येत या निर्णयाला विरोध दर्शवला असून भविष्यात मोठे जनआंदोलन उभे करण्याचा इशाराही दिला आहे."निसर्गसंपत्ती व स्थानिक हिताचे रक्षण करण्यासाठी आम्ही शेवटच्या श्वासापर्यंत लढू," असा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर सिडको प्रशासनाने नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन तोडक कारवाईचा पुनर्विचार करावा, अशी मागणीही ग्रामस्थांनी केली असून कारवाई केल्यास कारवाई विरोधात जनआंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

## कामोठे येथे वाल्मिकी समाजमंदिरास माजी नगरसेवक विकास घरत यांची सदिच्छा भेट

**दैनिक युवक आधार**
**खांदा कॉलनी प्रतिनिधी**

कामोठे शहर मंडल अध्यक्ष पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर कामोठेतील माजी नगरसेवक विकास गरज यांनी विविध ठिकाणी सदिच्छा भेट दिल्या यात कामोठे येथील वाल्मिकी समाज मंदिरास त्यांनी सदिच्छा भेट दिली यावेळी त्यांनी वाल्मिक समाज बांधवांच्या समस्या जाणून घेतल्या व लवकरच त्या सोडवण्याची ग्वाही दिली येथील समस्या आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निदर्शनातून आणून लवकरच त्या सोडवण्याच्या मी प्रयत्न करीन असे आश्वासन त्याने कामोठे येतील समाज बांधवांना दिले



## गुप्त दौऱ्याच्या आड मांडवलीचा डाव? आयुक्तांच्या सुट्टीतील करंजा भेटीमागे मच्छीमारांचा थेट सवाल!

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

शासकीय सुट्टीच्या दिवशी, मत्स्यव्यवसाय आयुक्तांचा करंजा बंदरावर गुप्त दौरा म्हणजे निव्वळ योगायोग की योजनाबद्ध "साटेलोट"? या एकाच भेटीने मच्छीमार समाजात उलथापालथ माजली आहे. करंजा बंदर आधीपासूनच भ्रष्टाचार, निकृष्ट कामे, आणि अवैध मासेमारीच्या आरोपांमुळे वादाच्या भोवऱ्यात आहे. याच ठिकाणी आयुक्तांनी कोणालाही न सांगता, थेट 'सुट्टीत' हजेरी लावल्याने संशयाचे ढग गडद झाले आहेत. विशेष म्हणजे, या बंदराच्या मालकीहक्कावरच प्रश्नचिन्ह असताना आयुक्तांनी तिथे 'डोकावणे' का पसंत केले? हा प्रश्न मच्छीमारांनी रोखठोकपणे उपस्थित केला आहे. दौऱ्यात आयुक्तांच्या डोळ्यासमोरच पर्ससीन बोटींनी खुलेआम मासळी विक्री केली, अवैध बांधकामे ताठ मानेने उभी राहिली; पण कारवाईचा शून्य ठसा! हाच मूकदर्शकपणा मच्छीमार समाजाच्या रोषाचा केंद्रबिंदू ठरत आहे. कोट्यवधी रुपये खर्च करूनही बंदरावर ड्रेजिंगचे काम अजून अधांतरी, त्यात बोटींना होणारे नुकसान, अरुंद रस्त्यांची कोंडी, आणि कोणाचाही ठोस हस्तक्षेप नाही–हे चित्र शासनाच्या अपयशाचा स्पष्ट दाखला देते. सर्वसामान्य मच्छीमारांशी संवाद न साधता गुपचूप भेट, सुट्टीचा दिवस, कोणतीही कारवाई नाही. या सर्व गोष्टी एका रचलेल्या नाट्यप्रवेशासारख्या भासत आहेत. विशेषतः लवकरच पावसाळी बंदी लागू होणार असताना हा दौरा वेगळ्याच हेतूने झाला असावा, असा ठोस आरोप काही प्रमुख मच्छीमार नेत्यांनी केला आहे. पावसाळी बंदीतही मागील वर्षी मासेमारी सुरू ठेवणाऱ्या बोटींमध्ये एक खलाशी बेपत्ता झाला होता, त्यावर आजतागायत चौकशी नाहीच. त्यात स्थानिक परवाना अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई म्हणजे यंत्रणेच्या खालावलेल्या पताची कहाणीच! म्हणून आता मागणी आहे एकच मत्स्यव्यवसाय मंत्र्यांनी या गुप्त दौऱ्याची चौकशी करावी आणि जर साटेलोट सिध्द झाले, तर दोषींना जशास तसं उत्तर द्यावं! अशी मागणी जोर धरू लागली आहे.



# सीआरपीएफचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भगवान यादव नेतकर यांना वीरमरण

### पारोळा तालुक्यासह उंदीरखेडे गावावर तीव्र शोककळा
### शासकीय इतमामात भगवान नेतकर यांच्यावर अंत्यसंस्कार



**दैनिक युवक आधार**
**जळगावः(आनंद पवार)**

भारत भूमीच्या संरक्षणार्थ देशाचे रक्षण करणारे जळगाव जिल्हा पारोळा तालुक्यातील उंदीरखेडे या ग्रामीण भागातील रहिवाशी असलेले सीआरपीएफचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भगवान यादव नेतकर यांचे बालाघाट या ठिकाणी कर्तव्य बजावत असतांना ८ मे रोजी पहाटे ३:३० दरम्यान वीरमरण आले. मृत्यू समयी ते५५ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी,२ मुले,सून,एक मुलगी, जावई नातवंडे असा मोठा परिवार आहे.

अत्यंत प्रेमळ मनमिळावू स्वभावाचे असलेले भगवान नेतकर यांच्या आकस्मित निधनामुळे संपूर्ण पंचक्रोशीत तीव्र शोककळा पसरली. बालाघाट येथून त्यांचे पार्थिवदेह त्यांच्या जन्म गावी उंदीरखेडे येथे आणल्यावर शासकीय इतमामात त्यांच्यावर अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्ययात्रेत सीआरपीएफ डेप्युटी कमांडर श्री. मनोज कुमार व त्यांचा संपूर्ण स्टाफ तसेच पारोळा पोलीस स्टेशनचे अधिकारी व पोलीस स्टाफ तसेच माजी परिवहन मंत्री डॉ.सतीश पवार,जळगावच्या खासदार स्मिताताई वाघ,पारोळ्याचे तहसीलदार डॉ.उल्हास देवरे,पारोळ्याचे गटविकास अधिकारी संजय मोरे,जळगाव जिल्ह्याचे मा.सैनिक अधिकारी रतिलाल महाजन,विश्वनाथ उगले,यांच्यासह विविध शासकीय,राजकीय, सामाजिक,धार्मिक, शैक्षणिक,क्रीडा व पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी सीआरपीएफचे जवान व पोलीस बांधवांनी सशस्त्र मानवंदना दिली. यावेळी कुटुंबीयांसह अनेकांना अश्रू अनावर झाले.भगवान यादव नेतकर यांचा जलदान विधी व शोकसभेचा कार्यक्रम सोमवार दि.१२ मे रोजी पारोळा येथील त्यांच्या निवासस्थानी होणार असल्याचे कुटुंबियांकडून सांगण्यात आले.

## मनाच्या पाण्याने तहान भागवणारा सेवाभावी
### रेवदंडा -चौलचे संदीप म्हात्रे समाजसेवेत पुढे

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**



आजच्या यांत्रिक आणि स्वार्थी जगात सामाजिक जाणिवा जपणाऱ्या व्यक्तींची संख्या कमी होत चालली आहे. मात्र, रेवदंडा येथील संदीप म्हात्रे हे त्याला अपवाद ठरत आहेत. कोणतीही प्रसिद्धी नको, कोणताही गाजावाजा नको फक्त लोकांच्या उपयोगी पडावं, एवढीच त्यांची भावना. पाण्याची टंचाई जाणवत असताना त्यांनी अनेक ठिकाणी निःस्वार्थपणे पिण्याच्या पाण्याची सोय केली आहे.अष्टविनायक मंदिर ठरते 'थांबा व तहान भागवा' केंद्र संदीप म्हात्रे चौलच्या अष्टविनायक मंदिरात दररोज पिण्याचे पाणी ठेवतात. चौल, वावे, आग्राव, शितळादेवी, बेलाई आदी भागांतून चालत निघणारे श्रद्धाळू वाटेत येथे थांबतात आणि इथे ठेवलेल्या पाण्याने तहान भागवतात. या छोट्याशा उपक्रमातून एक मोठा माणुसकीचा संदेश दिला जात आहे.रेवदंडा हायस्कूलजवळ विद्यार्थ्यांसाठी पाण्याची सुविधा रेवदंडा हायस्कूलसमोरील रवींद्र शिंदे यांच्या चहाच्या गाडीवरही संदीप म्हात्रे यांनी पाण्याची टाकी ठेवली आहे. शाळेतील विद्यार्थी, मच्छी विक्रेते आणि प्रवासी यांचा येथे वावर मोठ्या प्रमाणावर असतो. त्यांना थंडगार पाणी सहज उपलब्ध होते. "लोकं समाधानाने पाणी पिताना पाहून खूप बरं वाटतं," असं म्हात्रे सांगतात. प्राथमिक आरोग्य केंद्रातील पेशंटसाठी दिलासा रेवदंडा प्राथमिक आरोग्य केंद्रात येणाऱ्या पेशंटसाठी देखील संदीप म्हात्रे यांनी पाण्याची व्यवस्था केली आहे. अनेक दिवसांपासून ते नियमित ही सेवा देत आहेत. थकलेले, आजारी लोक इथे थांबून थोडी विश्रांती घेतात आणि पाणी पिऊन नव्या उत्साहाने पुढे जातात.फक्त माणसांसाठीच नव्हे, पक्ष्यांसाठीही 'पाणवठे'संदीप म्हात्रे केवळ मानवासाठीच नव्हे, तर पक्ष्यांच्या तहानीकडेही लक्ष देतात. झाडांखाली, गच्च्यांवर, सार्वजनिक जागांमध्ये पक्ष्यांसाठीही पाण्याची भांडी ठेवतात. त्यांची ही संवेदनशीलता खरोखरच कौतुकास्पद आहे."जोपर्यंत शक्य आहे, तोपर्यंत पाणी देत राहीन"संदीप म्हात्रे म्हणतात, "पाणी देताना जो आनंद मिळतो, ते समाधान कोणत्याही गोष्टीत नाही. जोपर्यंत शक्य आहे, तोपर्यंत मी ही सेवा करत राहीन. "रेवदंड्यासारख्या ग्रामीण भागात अशा सेवाभावी वृत्तीची माणसं आजही आहेत, हेच या उपक्रमातून स्पष्ट होतं. ही बातमी केवळ कौतुकापुरती न राहता, अनेकांसाठी प्रेरणा ठरेल.

## सिद्धांत सामाजिक संस्थेच्यावतीने कोंढाणे लेणीत स्वच्छता अभियान

**दैनिक युवक आधार**

**पनवेल/प्रतिनिधीः** कोंढाणे लेणीवर पनवेल येथील सिद्धांत सामाजिक संस्थेच्यावतीने बुद्ध पौर्णिमेच्या निमित्त रविवार 11 मे रोजी 2025 रोजी स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. बुद्ध कालीन लेणी हे कर्जत तालुक्याचे आकर्षण असल्याने देशभरातील अभ्यासक या ठिकाणी लेणी पाहण्यासाठी येत असतात. बुद्ध पौर्णिमा निमित्ताचे औचित्य साधून सिद्धांत सामाजिक संस्था या संघटनेचे वतीने कर्जतपासून काही अंतरावर असलेल्या बुध्द लेणी कोंढाणे लेणी येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. यावेळी पनवेल तालुक्याच्या पदाधिकारी यात सहभाग घेऊन मोहीम यशस्वी करणार असल्याचे मयुर जाधव यांनी सांगितले.

# चिपळूण मध्ये तब्बल ४९३ इमारती 30 वर्षाहून अधिक जुन्या

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार**
**दि. ११ मे**

अलीकडच्या काळात झपाट्याने विकसित होणार्या चिपळूण शहरात तब्बल ४९३ इमारती तीस वर्षाहून अधिक जुन्या असल्याची बाब समोर आली आहे. यातील काही इमारती धोकादायक झाल्या असून यातील काही इमारती किंवा इमारतीच्या धोकादायक पडझड होऊन त्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. याच पार्श्वभूमीवर मालक भोगवटादार आणि भाडेकरू यांना नोटीस बजाऊन इमारतीचे स्ट्रक्चर ऑडीट करून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दरड ग्रस्त भागातील १३५ नागरीकांना व नदी किनारी अनधिकृत पणे घरे झोपड्या उभारणार्यानाही स्थालांतरित होण्याच्या सुचना करण्यात आल्या आहेत. कोकणातील मध्यवर्ती ठिकाणी वसलेल्या चिपळूण शहरात १९९० च्या दशकात फारशा इमारती नव्हत्या फक्त कौलारू घरे होती. मात्र त्यानंतर शहरात दोन ते तीन इमारती उभारण्यात आल्या. १९९५ पासून मात्र एकामागून एक इमारती उभ्या राहिल्या. तेव्हापासून शहर मात्र झपाट्याने वाढत गेल.सध्यस्थितीत शहरात ७०० हून अधिक इमारती असून ७५०० सदनिका आहेत. तर मालमत्ता धारक सुमारे २२ हजार आहेत. यातील बहुतांश इमारती नवीन अ असून मात्र ज्या इमारतीना ३०ते ३५ वर्षाचा कालावधी पूर्ण झाला आहे अशा इमारती धोकादायक मानल्या जाता आहेत. या इमारती चे स्ट्रक्चर ऑडीट करून घेने गरजेचे असून यासंदर्भात नगरपालिका प्रशासन दरवर्षी आव्हान करीत असून पालिकेच्या या आव्हानांला फार कमी प्रतिसाद मिळत आहे. संध्या शहरात ४९३ इमारती ३० वर्ष पूर्ण झाली आहेत तर ५० हुन आधिक इमारती धोकादायक स्थितीत असल्याची माहिती मिळत आहे. पावसाळा तोंडावर असल्याने या सर्व इमारत धारकांना नगरपालिकेने नुकत्याच नोटीस बजावली असून स्ट्रक्चर ऑडीट करून घेण्याच्या सूचना केल्या आहेत. काही इमारती धारकांना नगरपालिकेने ती ते चार वेळा सूचना व नोटीस देऊनही बांधकाम तोडलेले नाही. तसेच नगर रचना विभागाकडून त्याच्या वर कोणती कारवाई ही केली जात नाही त्यामुळे त्या त्या भागातील नागरीकांना अक्षरश जीव मुठीत घेऊन राहण्याची वेळ आली आहे. याचबरोबर शहरातील दरड ग्रस्त भागातील १३५ नागरीकांना नदी किनाऱ्यावर अनधिकृत पणे घरे व झोपडपट्टी उभारणार्या नोटीस द्वारे स्थालांतरित होण्याच्या दृष्टीने सुचना करण्यात आल्या आहेत. या सुचनानकडे दुर्लक्ष करून भविष्यात कोणत्याही प्रकारची दुर्घटना घडली किंवा त्यातुन जीवीत व वित हाणी झाल्यास त्यास प्रशासन जबाबदार राहणार नाही. असा इशारा ही देण्यात आला आहे.

## पंतप्रधान घरकुल आवास योजनेसाठी लाभार्थ्यांनी 15 मे पर्यंत सर्वे, नोंदणी करून घ्यावी

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी.**
**रणजीत सिंह ठाकुर**
**"सामाजिक कार्यकर्ते प्रदीप पट्टेबहादूर यांची आवाहन"**

**वाशीम** : प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेसाठी गरजावंत ग्रामस्थांनी आपली नोंदणी सर्वे मोबाईल सेल अप द्वारे नोंदणी करावी असे आव्हान सामाजिक कार्यकर्ते तथा जिल्हा युवा पुरस्कारार्थी प्रदीप पट्टेबहादूर यांनी केले आहे. मागील त्यांना घरकुल मा. पंतप्रधान यांच्या घोषणेनंतर जिल्ह्यात पीएम आवास घरकुल योजना नोंदणी सुरू आहे ज्याला भरत्यांचे मागील यादीत नाव नसेल त्यांनी या पीएम आवास योजनेचा लाभ घ्यावा व आपली नोंदणी सेल्फ सर्वेतून मोबाईल अप मधून अपद्वारे नोंदणी करावी ऑफलाईन अर्ज पूर्ण कागदपत्रासह ग्रामपंचायत मध्ये अर्ज सादर करावा असे आव्हान यांनी केले आहे. पीएम आवास योजनेची तारीख 30 एप्रिल होती परंतु आता ही अर्ज स्वीकारण्याची मुदत 15 मे 2025 पर्यंत वाढवण्यात आली आहे. तरी यासाठी नागरिकांनी पंतप्रधान घरकुल आवास योजनेचा लाभ घ्यावा पीएम आवास यांनी निकषात बसणाऱ्या सर्व गरजू नागरिकांना घरकुल मागण्याची अधिकार आहे. आणि त्यासाठी आपण अर्ज आपणच करावा ऑनलाईन सेल्फ सर्वे नोंदणी केल्यानंतर ऑफलाईन कागदपत्रे ग्रामपंचायत मध्ये जमा करावे या योजनेसाठी कोणतेही अमिषाला बळी पडू नाही अथवा एजंट मार्फत आपण अर्ज सादर न करता स्वतः करावा तारखेच्या आत आपण आपली नोंदणी करून या पंतप्रधान घरकुल आवास योजनेचा लाभ घेऊन आपण आपल्या हक्काच्या घराचे मालक व्हावेसे आव्हान यावेळी युवा सामाजिक कार्यकर्ते तथा जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त (मा.शा) नेहरू युवा बहुउद्देशीय मंडळ अध्यक्ष प्रदीप पट्टेबहादूर यांनी केले आहे.

### बाप

पाणी लपललं।
दुःख झाकललं ॥
तेज सांडलेलं ।
बापरूप ॥

वेदना सोसीतो ।
यातना पाहतो ॥
हसत राहतो ।
मायबाप ॥

देह काळाकुट्ट ।
फेटा मळकुट्ट ॥
सपन अफाट ।
दादाबाप ॥

डोळ्यात ती माया ।
पाठीशी ही छाया ॥
कष्टाची च काया ।
माझाबाप ॥

रात्र ही जागतो ।
थकवा झेलतो ॥
लढाई लढतो ।
महाबाप ॥

रक्ताचं ही पाणी ।
घामाच्या या धारा ॥
अश्रुचा तो वारा ।
तिथंबाप ॥

**प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर**
**( रमाईसुत ).**
**छत्रपती संभाजीनगर**

## नागाव – हटाळे आठवडा बाजाराने गाठला भरारीचा टप्पा; १३५ वर्षांची परंपरा आजही तेजात; स्थानिक व्यापाराला नवे बळ ; ग्राहक-पर्यटकही भारावले

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

आठवडा बाजार म्हणजे केवळ खरेदीच नव्हे तर एक सजीव परंपरा. नागाव – हटाळे येथील आठवडा बाजाराने तब्बल १३५ वर्षांची परंपरा आजही कायम ठेवली आहे. दर आठवड्याला येथे होणारी लाखो रुपयांची उलाढाल, स्थानिक व्यापाऱ्यांना मिळणारा मजबूत आधार, आणि ग्राहकांचा वाढता प्रतिसाद यामुळे हा बाजार नव्या जोमात फुलतोय."शहरातल्या मॉलमध्ये मिळणार नाही अशा पारंपरिक गोष्टी इथे सहज मिळतात," असं सांगताना अलिबागच्या प्रणाली म्हात्रे यांनी आठवडा बाजाराविषयीचा अभिमान व्यक्त केला. त्यांनी बाजारातून घरी बनवलेले लोणचं, पापड आणि घरगुती मसाले घेतले.पर्यटकही या बाजाराच्या चाहात्यांमध्ये सामील झाले आहेत. "कोकणात फिरायला आलो होतो, पण या बाजारात थांबून खरेदीचा खूप छान अनुभव मिळाला," असं मुंबईहून आलेल्या पर्यटक निता म्हात्रे यांनी सांगितलं. त्यांनी कोकम, चिंच आणि भट्टीवर भाजलेले शेंगदाणे खरेदी करतानाची मजा अनुभवली.या बाजाराची सुरुवात फक्त १५ विक्रेत्यांपासून झाली होती. आज इथे शेकडो विक्रेते आणि हजारो ग्राहक एकत्र येतात. "या बाजारामुळे घरखर्चाचं बजेटही सांभाळता येतं आणि माणुसकीने व्यवहार होतो," असं मत स्थानिक गृहिणी पूनम पाटील यांनी व्यक्त केलं.

ग्राहक, पर्यटक, विक्रेते सगळ्यांनाच आठवड्याचा हा बाजार म्हणजे एक उत्सव वाटतो. मॉलच्या तुलनेत घासाघीस करण्याची मजा, पारंपरिक वस्तूंची उपलब्धता आणि स्थानिकांच्या कष्टाला मिळणारा योग्य मोबदला हे सगळं यामागचं यश आहे.







## शिवशक्ती मित्र मंडळ, लाईन आळी पनवेलने आयोजित केलेल्या लाईन आळी क्रिकेट प्रिमियर लीग 2025 अलंकार फाईटर्स प्रथम तर अभिज स्ट्रायकर्स द्वितीय

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

शिवशक्ती मित्र मंडळ, लाईन आळी पनवेलने आयोजित केलेल्या लाईन आळी क्रिकेट प्रिमियर लीग 2025 अलंकार फाईटर्स प्रथम तर अभिज स्ट्रायकर्स द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. शिवशक्ती मित्र मंडळ, लाईन आळी पनवेल लाईन आळी प्रीमियर लिग - 2025 यंदाचे 10 वे वर्ष होते. संघ मालक अलंकार महाजन ह्यांचा अलंकार फाईटर्स प्रथम व उप विजेता संघ ठरला आहे संघ मालक संदीप पाटील ह्यांचा अभी'ज स्ट्रायकर्स हा ठरला आहे. या स्पर्धेसाठी विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार उपस्थित होते. त्यामध्ये प्रामुख्याने चंद्रशेखर सोमण, महेश सावंत, संजय कदम, हेमंत सावंत, दिलीप चंदने, चंदू म्हात्रे, केदार भगत, सुमित झुंजारराव, अभिजित साखरे, आकाश घाटे, शांतनु घरत, शुभम माळी असे अनेक मान्यवर या स्पर्धेचा आनंद घेण्यासाठी उपस्थित होते. आमदार विक्रांत पाटील यांच्या हस्ते या स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा पार पडला. त्यावेळी उपस्थित




मंडळाचे संस्थापक अध्यक्ष रमेश दादा गुडेकर, मंडळाचे अध्यक्ष संदीप पाटील, उपाध्यक्ष रवी (पिंट्या) गोरे, कार्याध्यक्ष खंडेश धनावडे, कार्याध्यक्ष समीर कदम, सहकार्याध्यक्ष प्रकाश (नानू) वाघे, सहकार्याध्यक्ष प्रविण पोवार, संयुक्त चिटणीस प्रशांत नरसाळे, हिशोब तपासणीस अरुण ठाकूर, खजिनदार संतोष तळेकर, सहखजिनदार अनिकेत जाधव व त्याच बरोबर मंडळाचे सभासद उपस्थित होते. लाईन आळी प्रीमियर लिग ह्या स्पर्धेसाठी लाईन आळी प्रीमियर लिग कमिटीने दिवस रात्र मेहेनत करून ही स्पर्धा यशस्वी रित्या पार पडली.

## कामोठेत "मा. श्री. परेशशेठ ठाकूर केसरी" भव्य कुस्ती स्पर्धा; दिग्गज मल्ल आमने-सामने

### लाल मातीत पुन्हा एकदा कुस्तीचा रोमांचक थरार!

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**



महाराष्ट्राच्या मातीतून जन्मलेली आणि राज्याच्या परंपरेशी नाळ जुळवणारी कुस्ती केवळ खेळ नसून, शौर्य, परंपरा आणि संस्कृतीचे प्रतीक आहे. याच परंपरेला पुन्हा उजाळा देत पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते व युवकांचे प्रेरणास्थान परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा कामोठे आणि रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशनच्या वतीने"मा.श्री. परेशशेठ ठाकूर केसरी" भव्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा रविवार, दिनांक १८ मे २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता कामोठे येथील सेक्टर ६ मधील लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या भव्य मैदानात लाल मातीवर पार पडणार आहे. या स्पर्धेतील एकूण पारितोषिकांची रक्कम ११ लाख ११ हजार १११ रुपये इतकी असून, नामवंत मल्ल या स्पर्धेत आपल्या ताकदीची चुणूक दाखवणार आहेत. कुस्ती स्पर्धा फक्त एक खेळ नाही, तर देशाच्या मातीतल्या परंपरेचा, ताकदीचा आणि सन्मानाचा एक उत्सव असतो. लढतींत ताकद, धैर्य आणि कुशलता यांचा सुरेख संगम पाहायला मिळतो. त्यामुळे लाल मातीच्या या खेळाला अनन्य साधारण महत्व आहे. या स्पर्धेत रुस्तम ए हिंद पै. सिकंदर शेख विरुद्ध हिंद केसरी पै. सुखविंदर सिंह, ट्रिपल महाराष्ट्र केसरी पै. विजय चौधरी विरुद्ध पै. रिकार्डो अमेरिका (अमेरिका), डबल महाराष्ट्र केसरी पै. शिवराज राक्षे विरुद्ध हिंद केसरी पै. विक्रांत कुमार तसेच उपमहाराष्ट्र केसरी किरण भगत विरुद्ध हिंद केसरी पै. हितेंद्र कुमार या दिग्गज व नामवंत कुस्तीपटूंचे रोमहर्षक सामने होणार आहेत. त्या अनुषंगाने या स्पर्धेची जोरदार तयारी सुरु करण्यात येत आहे.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# स्कुटी गाडीची चोरी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**
पनवेल शहरातील शिवशंभो नाका येथील न्यू पंजाब हॉटेल समोर उभी करून ठेवलेली दुचाकी गाडी अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याची घटना घडली आहे. दिनेश राजानी यांनी त्यांची 20 हजार रुपये किंमतीची होंडा ॲक्टीव्हा गाडी ही हॉटेल समोर उभी असताना अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# बोलण्यात गुंतवून दुकानातील रोख रक्कम केली लंपास


**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**
बोलण्यात गुंतवून दोघा अनोळखी व्यक्तींनी दुकान मालकाला बोलण्यात गुंतवून दुकानातील कॅश काऊंटरमधून रोख रक्कम लंपास केल्याची घटना ओरियन मॉलमध्ये घडली आहे.
येथील अमुक्ती शॉपमध्ये दोन अनोळखी व्यक्ती त्यामध्ये एक पुरुष व एक महिला ग्राहक बनून दुकानात आले व त्या पैकी अनोळखी मुलीने दुकानातील कर्मचाऱ्याला बोलण्यात गुंतवून तिच्याबरोबर असलेल्या मुलाने दुकानातील कॅश काऊंटमध्ये ठेवलेली 20 हजार रु. रोख रक्कम लबाडीने चोरुन ते पसार झाले आहेत. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# अज्ञात चोरट्याने केली सुपर मार्केट शॉपमध्ये चोरी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**
एका अज्ञात चोरट्याने पनवेल तालुक्यातील नेरे सुपर मार्केट शॉपमध्ये चोरी करून आतील ऐवज तसेच रोख रक्कम चोरुन नेल्याची घटना घडली आहे. नेरे सुपर मार्केट शॉपचे शटर अज्ञात चोरट्याने कश्याचे तरी सहाय्याने तोडून व आत प्रवेश करून दुकानातील विविध सामान व रोख रक्कम असा मिळून जवळपास 71 हजार 500 रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेला आहे. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# सोमवार पासून उदमाई देवी यात्रेला सुरुवात

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**
वैशाख शुद्ध पौर्णिमेला उदमाई देवी यात्रा उत्सवाला सुरुवात होत असून हा यात्राउत्सव सोमवार दि १२ मे ते १४ मे असा तीन दिवस सुरू राहणार असून आत्तापासूनच भाविकांना या यात्रेची ओढ लागली आहे. सोमवारी पहाटे पाद्यपूजा व महापूजा होऊन देवीच्या पालखीचे उद्‌घट गावाहून वाजत गाजत प्रस्थान होईल. सायंकाळी दारूगोळा आतीषबाजी पहायला मिळणार आहे.मंगळवारी पहाटे चार वाजता देवीचा भव्य छबीना व महापूजा होणार असून या तीन दिवसाच्या काळात कुस्त्यांचे जंगी मैदान, ऑर्केस्ट्रा,तमाशा अशा अनेक विविध मनोरंजनाचे कार्यक्रमाचे आयोजन यात्रा कमिटीने केले आहे.



गावोगावी चाललेल्या यात्रांची सांगता उदमाई देवीच्या यात्रेने होत असल्याने या यात्रेला हिंगणेवाडी,सपकळवाडी मानकरवाडी,तावशी, कुरवली,थोरात वाडी,जांब,चिखली इ. परिसरातून मोठ्या प्रमाणावर गर्दी होतअसते. नवसाला पावणारी देवी म्हणून उदमाई देवीचा नावलौकिक असल्याने गेल्या अनेक वर्षांपासून पंचक्रोशीतील भाविक मोठ्या भक्ती भावाने या यात्रेत सहभागी होतात. संपूर्ण मंदिरावर विद्युत रोषणाईन केली असून आतापासूनच मंदिराचा परिसर खेळण्याची खेळण्याची दुकाने, हॉटेल्स,पाळणे, यांनी फुलायला सुरवात झाली आहे.

# अवकाळी पावसाने जनजीवन विस्कळीत. सरपंच घोटा - धनंजय मुसळे.!!

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम.**
**गजानन पवार.**



वाशिम जिल्ह्यात दिनांक 10 ते 11 मे दरम्यान अचानक आणि अनपेक्षितपणे पडणाऱ्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले.
मे महिन्यात अतिशय कडक उन्ह सुरू असतांना अकस्मात पडलेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला. उन्हाच्या दाहकते पासून दिलासा मिळाला असला तरी काही ठिकाणी सोसाट्याच्या वाऱ्यामुळे लग्न मंडपात विघ्न आले. तर काही ठिकाणी सत्संग, कीर्तन, भागवत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. परंतु अचानक आलेल्या पावसामुळे भाविक भक्तांची मोठी तारांबळ उडाली. त्यांना मिळणाऱ्या आध्यात्मिक ज्ञानग्रहनापासून मुकावे लागले.पावसामुळे कापणीसाठी जवळपास तयार असलेल्या पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले. मुंग, एरंडा, कांदा, भाजीपाला, फळबागा अश्या आदी पिकांचे नुकसान झाले. कर्जाच्या ओझ्याखाली आधीच पिचलेल्या हतबल झालेल्या शेतकऱ्यांने पिकसर्वेशन करून सरकारने नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी ग्रामपंचायत घोटा सरपंच धनंजय मुसळे यांनी केली आहे.

# काजू उत्पादनावर कोकण क्रांती करु शकतो

## कृषी प्रदेशनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी नवनवीन प्रयोग करावेत - पालकमंत्री डॉ. उदय सामंत

**दैनिक युवक आधार**
**रत्नागिरी, (जिमाका)-** ब्राझीलप्रमाणे कोकणदेखील काजू उत्पादनावर क्रांती करु शकतो. कृषी प्रदर्शनाचा उपयोग करुन शेतकऱ्यांनी नव नवीन प्रयोग करावेत, असे पालकमंत्री डॉ.उदय सामंत यांनी सांगितले. कृषी तंत्रज्ञान विस्तार सप्ताह व कृषी विकास परिषदेमध्ये प्रयोगशील आणि विविध स्पर्धेतील विजयी शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले, महसूल राज्यमंत्री योगेश कदम, अपर जिल्हाधिकारी भाऊसाहेब गलांडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी परिक्षित यादव आदी उपस्थित होते.





पालकमंत्री डॉ. सामंत म्हणाले, रत्नागिरीचा हापूस आंतरराष्ट्रीय दर्जावर विक्री करतोय. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी जगातील विविध लागवडीकडे वळले पाहिजे. भात, नाचणी, फळबगांचे लागवड क्षेत्र वाढले पाहिजे. त्यासाठी आत्मपरिक्षण केले पाहिजे. नोकरीपेक्षा १० पट पैसे हे शेतीमधून मिळवू शकतो. त्यासाठी शेती वाढविली पाहिजे. शेती उत्पन्नाला कर नाही. शासनाने विविध योजना दिल्या आहेत. या योजनांचा फायदा घेवून शेती करायला हवी. निसर्ग सुधारायचा असेल आणि प्रक्रिया उद्योग निर्माण करायचा असेल तर बांबू लागवडीला पर्याय नाही. पुढचे कृषी प्रदर्शन हे राज्यातील प्रथम क्रमांकाचे असेल, असेही पालकमंत्री म्हणाले. फलोत्पादन मंत्री श्री गोगावले म्हणाले, फळबागा लागवडीसाठी १०० टक्के फलोत्पादन पूर्वीची शेतकऱ्यांच्या फायद्याची योजना सुरु करणारा ऐतिहासिक निर्णय शेतकऱ्यांसाठी घेतला जाईल. दर्जेदार बियाणे, खते शेतकऱ्यांना वेळेत मिळण्यासाठी अधिकाऱ्यांनी तत्परतेने कार्यवाही करावी. फळबाग वाढीसाठीचे यंदाचे १९०० हेक्टर उद्दिष्ट पूर्ण करावे. म्हणजे मुंबईत होणारे स्थलांतर थांबेल. अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना तयार करावे. काय केल्यावर काय होतेय, याची माहिती द्यावी. बांबूला ७ लाख सबसिडी दिली जाते. शिवाय तो टनावर विक्री होतो. त्यापासून प्रक्रिया उद्योगातून मोठा रोजगार आणि उत्पन्न मिळते.

शेतकऱ्यांसाठी जेवढं करता येईल तेवढं करतोय. शासनाच्या योजनांचा फायदा घेवून शेतकऱ्यांनी शेती व्यवसाय वाढवावा, असेही ते म्हणाले. महसूल राज्यमंत्री श्री कदम म्हणाले, शेती हा व्यवसाय म्हणून उदयास येत आहे. तो विकसित होत आहे. कृषी प्रदर्शनाच्या निमित्ताने चांगला उद्देश साध्य करतोय. याचा उपयोग शेती हा मोठा व्यवसाय करण्यासाठी करावा. शेतकऱ्यांनी ई पीक पाहणी नोंदणी करावी. अग्रीस्टॅकदेखील पूर्ण करावे. शेतीपूरक वौयवसाय वाढविण्यासाठी जलसंधारणाची कामे पूर्ण करावीत. पाणी अडवण्याची मोहीमही राबवावी, असे आवाहनही त्यांनी केले.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शिवकुमार सदाफुले यांनी यावेळी स्वागत प्रास्ताविक केले. यावेळी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रुग्णांच्या सुदृढतेसाठी परिचारिकांचे समर्पण कौतुकास्पद

## मान्यवरांचे गौरवोद्‌गार : पत्रकार मित्र असोसिएशनतर्फे नर्सेस दिनानिमित्त सत्कार













**दैनिक युवक आधार**
**पनवेल / प्रतिनिधी**
रुग्णालयात रुग्ण उपचारासाठी दाखल झाल्यानंतर त्याच्या नातेवाईकांइतकीच काळजी परिचारिकांकडून घेतली जाते. डॉक्टर वैद्यकीय उपचार करतात त्याबरोबरच रुग्णांसाठी अहोरात्र जागणा-या परिचारिकांचे समर्पण म्हणजे खरोखरच कौतुकास्पद असते असे गौरवोद्‌गार मान्यवरांनी काढले. आद्यपरिचारिका प्लॉरेन्स नाइटिंगेल यांचा जन्मदिवस सर्वत्र आंतरराष्ट्रीय नर्सेस दिन म्हणून साजरा केला जातो. याच नर्सेस दिनाचे औचित्य साधून पनवेल येथील डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयातील परिचारिकांप्रती ऋण व्यक्त करण्यासाठी पत्रकार मित्र असोसिएशन तर्फे सत्कार सोहळयाचा कार्यक्रम झाला. असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष केवल महाडीक यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते रुग्णालयातील नर्सेसना गुलापुष्प आणि स्मृतीचिन्ह देउन गौरविण्यात आले. पत्रकार मित्र असोसिएशन प्रत्येकाने समाजाप्रती केलेल्या कार्याची दखल वेळोवेळी घेत असते. नर्सेस दिनाच्या निमित्ताने आमचा केलेला सत्कार निश्चितच पुढील कार्यासाठी प्रेरणा देईल असे उदगार सत्कारार्थींनी व्यक्त केले. यावेळी रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. शिवाजी पाटील, डॉ. प्रमोद पाटील, सहायक अधिसेविका ज्योती गुरव यांच्यासह अधिकारी तसेच पत्रकार मित्र असोसिएशनचे अध्यक्ष केवल महाडीक, कार्याध्यक्ष नितीन जोशी, ग्रामीण अध्यक्ष शशिकांत दळवी, अनुराग वाघचौरे उपस्थित होते.

# ए.टी.एम. फोडणाऱ्या चोराला निफाड पोलिसांनी मोठ्या शिताफिने पकडले

## निफाड पोलिसांची मोठी कामगीरी

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी**
**राहूल कुलकर्णी**
निफाड येथे उगाव रोडवरील महाराष्ट्र बँकेचे ए.टी. एम फोडण्याच्या प्रयत्नात असणाऱ्या चोरट्याला निफाड पोलिसांनी शिताफीने पकडले असून यापूर्वी निफाड येथील ए.टी. एम फोडल्याची कबुली त्याने दिली आहे. याबाबत पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांनी अधिक माहिती दिली.रविवार दिनांक ११ रोजी पहाटे ४ वाजेचे सुमारास सचिन सुदाम ढेपले, वय ४० वर्षे, रा. नांदुर्डीरोड, निफाड, ता.निफाड, जि. नाशिक याने बँक ऑफ महाराष्ट्र, उगांवरोड, निफाड शाखा येथील ए टी एम केंद्रात लोखंडी कटावणीच्या व स्क्रू ड्रायव्हरच्या साह्याने ए टी एम कॅबिन मधिल सिसिटिव्ही कॅमे-याची नासधूस करुन ए टी एम मशिनच्या वायरी तोडुन मशिनचा पत्रा वाकवुन ए टी एम मशिन फोडुन चोरी करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी निफाड पोलीसांना सायरनचा आवाज आल्याने व बँकेचा लॅडलाईनवर फोन आल्याने क्षणाचाही विलंब न लावता निफाड पोलीस ठाण्याचे पोलीस पथक सदर ठिकाणी पोहचले. त्यावेळी चोरट्याने नकली पिस्तूलचा धाक दाखवुन पळून जाण्याचा प्रयत्न केला त्यावेळी चोरट्याचा पाठलाग करुन त्याला ताब्यात घेतले.सदर आरोपीला ताब्यात घेवुन त्याचेकडे विचारपुस करता त्याने निफाड शहरातील कोटक महिंद्रा बँकेचे ए टी एम फोडण्याचीही कबुली दिली आहे. फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन निफाड पोलीस ठाण्यामध्ये भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३३१ (४), ६२, ३२४, ११५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरिक्षक गणेश गुरव, सपोनि पाटील, पोउनि बाविस्कर, सारुक्ते, पो.शि. जाधव, सारंगधर, चकोर, जाधव यांच्या पथकाने वरिल गुन्ह्यातील आरोपीस पकडुन गुन्हा उघडकीस आणला आहे, गुन्ह्याचा पुढिल तपास वरिष्टांचे आदेशाने सपोनि ईश्वर पाटील करित आहे.




# पनवेल फुटबॉल लीग २०२५ चे आयोजन; स्थानिक फुटबॉलसाठी भव्य पर्व

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**
महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते व युवा पिढीचे प्रेरणास्थान परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा खारघरच्या वतीने पनवेल फुटबॉल लीग आयोजित करण्यात आली असून शुक्रवार दिनांक १६ मे रोजी सायंकाळी ०५ वाजता या लीगचे भव्य उदघाटन खारघरमध्ये अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. या लीगमधील विजेत्या संघाला ५० हजार रुपये व चषक, द्वितीय क्रमांकाला २५ हजार व चषक आणि तृतीय क्रमांकास १० हजार रुपये व चषक असे मुख्य बक्षिसांचे स्वरूप आहे.



१६ व १७ मे २०२५ रोजी मोठ्या उत्साहात हि स्पर्धा पंडित दीनदयाल उपाध्याय मैदान, सेक्टर ७, खारघर येथे होणार आहे. या लीगमध्ये ८ निवडक संघ आपले कौशल्य सादर करण्यासाठी आणि विजेतेपदासाठी मैदानात भिडणार आहेत. परदेशात फुटबॉल प्रिमिअर लीग खेळली जाते, ती स्पर्धा लहान आयोजनातून उत्तरोत्तर मोठी झाली आणि या स्पर्धेचा जगभर नावलौकिक झाला. आपल्या देशात विशेषतः हा खेळ क्रिकेटप्रमाणे जास्त खेळला जात नाही. मात्र शारीरिक व्यायाम व तंदुरुस्तीच्या बाबतीत हा खेळ गणला जातो. या आयोजनाच्या प्रयत्नातून या खेळाची आवड तरुणाईमध्ये निर्माण झाली पाहिजे, त्यासाठी पनवेल लीगच्या माध्यमातून प्रयत्न होणार आहे. तरुणांना प्रोत्साहन देणारा आणि एकोपा निर्माण करणारा हा खेळ असल्याने या खेळाचाही प्रसार व प्रचार झाला पाहिजे आणि स्थानिक फुटबॉलपटूंना व्यासपीठ मिळाले पाहिजे या दृष्टिकोनातून या पनवेल फुटबॉल लीगचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार ग्रँड ऑक्शनद्वारे संघ रचना झाली असून खारघर किंग, तळोजा टायटन्स, कळंबोली वॉरिअर्स, कामोठे नाईट्स, पनवेल सिटी फुटबॉल क्लब, पनवेल पॅन्थर, न्यू पनवेल युनायटेड, खांदा कॉलनी स्ट्रायकर्स या आठ संघाचा आणि नामवंत खेळाडूंचा सहभाग असणार आहे. "पनवेल फुटबॉल लीग ही स्पर्धा फक्त खेळापुरती मर्यादित नाही तर तरुणांना खेळाकडे वळविणारा एक सामाजिक उपक्रम ठरणार आहे तसेच या माध्यमातून खेळाडूंना पुढील स्तरावर जाण्याचा मार्ग मिळणार आहे.

# हॉटेल वैष्णवी तसेच हॉटेल पंचामृत या हॉटेल चालकांकडून कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची लूट ;प्रवाशांची आर्थिक लूट होण्यासाठी खाजगी ट्रॅव्हल्सचे चालक वाहक देखील तितकेच जबाबदार !

## शासनाच्या अन्न व औषध प्रशासन विभागाची डोळे झाक

दैनिक युवक आधार
मुंबई,(केतन भोज);कोकणात जाणारे चाकरमानी प्रवासी खाजगी ट्रॅव्हल्स मधून प्रवास करत असताना रात्रीच्या जेवणासाठी खाजगी ट्रॅव्हल्सचे वाहक चालक मुंबई गोवा महामार्गावरील पनवेल येथील हॉटेल वैष्णवी तसेच कोकणातून पुन्हा मुंबईसाठी परतीचा प्रवास करत असताना चिपळूणच्या जवळच असलेल्या हॉटेल पंचामृत याठिकाणी प्रवाशांच्या जेवणासाठी गाडी थांबवतात. तसेच शिमगा व गौरी गणपतीसाठी कोकणात जाताना याशिवाय आता मे महिन्याच्या मुलांच्या सुट्टीच्या दिवसात मुंबई गोवा महामार्गावरील या दोन्ही हॉटेल ला खाजगी ट्रॅव्हल्सवाले याठिकाणी जेवणासाठी गाडी थांबवत असल्यामुळे प्रवाशांची या हॉटेल ला प्रचंड गर्दी होते.त्यामुळे कोकणात जाताना तसेच कोकणातून मुंबईत येताना देखील सामान्यांच्या खिशाला याठिकाणी कात्री लागताना दिसत आहे.हे हॉटेल चालक







प्रवाशांच्या मजबुरीचा चांगलाच फायदा घेत असून,याठिकाणी सर्वसामान्य प्रवाशांची अक्षरशः लूट सुरु आहे.सर्वच अन्न पदार्थ चढया भावाने विकले जात आहेत.साधी पाणी बॉटल तसेच अन्य वस्तू देखील याठिकाणी छापील किंमती पेक्षा दुप्पट किंमतीने प्रवाशांना विकले जात आहेत,हॉटेल वैष्णवी तसेच हॉटेल पंचामृत या दोन्ही हॉटेल मध्ये अन्न पदार्थ देखील एकदम निष्कृट दर्जाचे बनवले जात असून,लांबचा प्रवास असल्याकारणाने व मजबुरीमुळे प्रवाशांना ते घ्यावे लागत आहेत.आणि या हॉटेलच्या ठिकाणी सर्वात गलिच्छ प्रकार म्हणजे अतिशय घाणेरडे किचन तसेच टॉयलेट ची देखील अत्यंत दुरवस्था येथे आहे.खाजगी सर्वच ट्रॅव्हल्सवाले यांना हे सर्व माहित असूनही देखील आपल्याला मोफत जेवायला मिळत असल्यामुळे तसेच आपली गाडी ही हॉटेलला जेवणासाठी लावत असल्यामुळे खाजगी ट्रॅव्हल्सच्या वाहक चालकाला हॉटेल चालका कडून टिप भेटत असल्यामुळे ते याठिकाणी आपल्या गाड्या थांबवतात. त्यांना प्रवाशांच्या आरोग्याची याठिकाणी कोणत्याही प्रकारची पर्वा असलेली दिसत नाही.या हॉटेल चालकांबरोबर हे खाजगी ट्रॅव्हल्सवाले प्रवाशांच्या आरोग्याशी खेळत आहेत.त्यामुळे हॉटेल वैष्णवी तसेच हॉटेल पंचामृत या दोन्ही हॉटेल चालकांकडून कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची लूट केली जात असून,प्रवाशांची आर्थिक लूट होण्यासाठी खाजगी ट्रॅव्हल्सचे चालक वाहक देखील तितकेच जबाबदार याठिकाणी दिसत आहेत,तरी संबंधित प्रशासन तसेच महाराष्ट्र शासनाचे अन्न व औषध प्रशासन विभाग याठिकाणी हेतुपुरस्सर डोळे झाक करत आहे का?असा प्रश्न याठिकाणी निर्माण होत आहे.तसेच अन्न व औषध प्रशासनाने तत्काळ मुंबई गोवा महामार्गावरील पनवेल येथील हॉटेल वैष्णवी तसेच चिपळूण जवळील हॉटेल पंचामृत मध्ये बनवल्या जाणाऱ्या सर्वच अन्न पदार्थांची तपासून करून यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी आणि या दोन्ही हॉटेलचे लायसन्स रद्द करावेत अशी सर्व प्रवासी वर्गाकडून केली जात आहे.

# जगाला युद्धाची नाहीतर बुद्धाची गरज

## शांतीवन बुद्ध विहार चिचाळ येथे वक्त्यांनी केले मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**
**भंडारा- वार्ताहर**
जगाला युद्धाची नाहीतर बुद्धाची गरज असल्याचे मत आज दिनांक 12 मे 2025 रोजी बुद्ध जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात वक्त्यांनी मार्गदर्शनातून सांगितले. पवनी तालुक्यातील शांतीवन बुद्ध विहार चिचाळ येथे तथागत गौतम बुद्ध यांची 2587 जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी बुद्ध, धम्म,संघ,वंदना घेण्यात आली. दीप प्रज्वलित करून तथागत व बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले. त्याचप्रमाणे तथागत गौतम बुद्ध, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा जय जय कार करण्यात आला . यावेळी प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे, शांतीवन बुद्ध विहाराचे संचालक जीवन बोधी बौद्ध, बुद्ध धम्मचारी अयाजी पट्टाचार्य शांतीनगर नागपूर , श्रामनेर बुद्धपाल,माजी उपसरपंच गुलाब घोडसे, अड्याळ येथील पोलीस निरीक्षक धनंजय पाटील प्रामुख्याने उपस्थित होते.जगाला युद्धाची नाही तर बुद्धाची गरज आहे अशाप्रकारे वक्त्यांनी आपले मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरता प्रमोद वासनिक ,प्रशांत बडोले, अश्विन मेश्राम,अंबादास मेश्राम, अर्चना धारगावे ,प्रमोद बिलवणे, कैलास राऊत ,राजकुमार कुर्जेकर, ,सुरेश उके, कुसुम मेश्राम, ज्योती उके, कल्पना मेश्राम, सुरेश मेश्राम, देवला वासनिक, प्रीती बारसागडे, कुंदा देशपांडे कळमना नागपूर यांनी सहकार्य केले.



# सती चिंचघरी प्राथमिक विद्यालयाच्या वाचकवीरांचा विशेष सन्मान

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण वार्ताहर**

सहयाद्रि शिक्षण संस्थेची प्राथमिक शाळा खेर्डी-चिंचघरी (सती) ता.चिपळूण हे प्राथमिक विद्यालय उपक्रमशील विद्यालय आहे. विविध गुणवत्तापूर्ण उपक्रमासोबत शाळेने वाचनासाठी विशेष काम केले आहे. एक पुस्तक शाळेसाठी, महावाचन चळवळ, वाढदिवसानिमित्त ग्रंथ भेट, अशा विविध उपक्रमातून शाळेच्या ग्रंथालयात ५००० पेक्षा अधिक पुस्तके उपलब्ध झाली आहेत. त्याचा उपयोग नियमितपणे वाचन कट्टा, फिरते ग्रंथालय, पुस्तक आपल्या दारी, वाचू आनंदे, पुस्तकाचे



झाड, गोष्टीचा शनिवार, एक तास वाचनासाठी, महावाचन चळवळ अशा विविध उपक्रमातून सर्व विद्यार्थ्यांचे वाचन समृध्द करण्यासाठी शाळा नियमित प्रयत्न करीत आहे. यातून महिन्याला सर्वाधिक पुस्तके वाचणा-या विद्यार्थ्यांचा वाचकवीर पुरस्कार देवून सन्मान करण्यात येतो. त्यातून इतर विद्यार्थ्यांना वाचनाची स्फुर्ती मिळते. वर्षभरात कु .जान्हवी प्रदीपकुमार यादव , कु .भार्गवी सचिन कदम , कु .आरव तुषार खालकर, कु . जुई संजय शिंदे कु . सर्वांग रोहित देसाई , कु स्मित समीर पिलवलकर , कु .सुयश संतोष सोलकर , कु . रुची दीपक घावरे , कु . मैथिली वैभव राणे , कु .मोक्षदा नंदकुमार हटकर , कु . निकुंज नितीन शिगवण , कु . सई महेंद्र बैकर , कु .दिया किरण म्हादे , कु .समर्थ गजानन लाड , कु .मनस्वी सचिन कदम , कु .प्रज्वल विनोद हुब्बळकर, कु . अनया संतोष लांबे , कु . श्रयांश रितेश जाधव या विद्यार्थ्यांनी वाचकवीर पुरस्कार प्राप्त केला आहे. शाळेचे मुख्याध्यापक श्री. अरविंद सकपाळ यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षिका सौ .मनीषा कांबळी, सौ . रश्मी राजेशिर्के , श्री संदेश सावंत , सौ . अपूर्वा शिंदे , श्रीम. वृषाली राणे , श्रीम .अर्चना देशमुख , श्रीम. ज्योती चाळके , सौ . रुपाली खरात ,श्रीम. वर्षा सकपाळ , सौ .शितल पाटील व सौ .स्वरा भुरण यांनी या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी योगदान दिले .

## जागजई गावाला आदिवासी समाजाची पंढरी मानल्या जात असलेल्या आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी दिली भेट

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी**
**:-जितेंद्र खोडे**

राळेगाव:-तालुक्यातील वर्धा नदीच्या तीरावर वसलेले जागजई गावात आज दि.१२-०५-२०२५ रोजी वैशाख पौर्णिमेनिमित्य दरवर्षी प्रमाणे यावर्षी यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे, या यात्रेला आदिवासी समाजाची पंढरी मानल्या जात असलेल्या जागजई गावाला आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी भेट घेतली आणि झेबुजी महाराज यांचे दर्शन घेतले या भेटी दरम्यान आयोजकांच्या वतीने मंत्री अशोक उईके यांचा भव्य सत्कार करण्यात आला यावेळी सन्मान पूर्वक भाविकांशी संवाद साधला.जागजई गावाला या दिवशी महत्त्व प्राप्त आहे येथे हजारोंच्या संख्येने आदिवासी बांधव महाराष्ट्र, तेलंगणा,मध्यप्रदेश राज्यात आपल्या कुलदेवतेसह वैशाख स्नान व देव दर्शन करण्यासाठी येत असतात भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून प्रशासनाकडून चोक व्यवस्था करण्यात आली आहे

## सणसर येथे बुद्धपौर्णिमा साजरी

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील सणसर येथील लूंबिनी बुद्ध विहार येथे बुद्ध प्रतिमेचे पूजन व बोधीवृक्ष यांचे पूजन करून बुद्ध पौर्णिमा साजरी करण्यात आली. यावेळी सणसरचे माजी सरपंच पांडुरंग निंबाळकर, सणसर सोसायटीचे संचालक पिंटू गुप्ते,भवानीनगर पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक मिठापल्ली साहेब,सावता परिषद अध्यक्ष प्रकाश नेवसे यांच्या हस्ते पूजन करण्यात आल. याकार्यक्रमावेळी राजेंद्र चव्हाण यांनी गौतम बुद्ध यांच्याविषयी माहिती सांगून बोधी वृक्ष याबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी भीमजयंती उत्सवाचे अध्यक्ष शांताराम चव्हाण,खजिनदार सुनील लोंढे,युवा उदयोजक विशाल चव्हाण, सिकंदर शेख,बापूराव चव्हाण,शामराव सोनवणे, शरद चव्हाण अभिषेक चव्हाण,प्रकाश अडागळे,
अजय कांबळे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



## मोबाईल हातात, पण माणूस मनात असावा!

**आसाराम विरकर**
**उपसंपादक ,दैनिक युवक आधार**
**,मराठवाडा आवृत्ती**

आजच्या डिजिटल युगात मोबाईल हा माणसाच्या जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे. शिक्षण, काम, संवाद, करमणूक – सर्व काही मोबाईलच्या माध्यमातून घडते. पण याच तंत्रज्ञानाच्या अतिरेकी वापरामुळे माणूस हळूहळू माणूसपण गमावू लागला आहे. एका सुंदर वाक्यात ही गोष्ट अगदी नेमकी मांडली आहे – "माणसांमध्ये माणूस असताना मोबाईल खिशात ठेवून माणसात राहावं; तिथं मोबाईल हातात ठेवून माणसं खिशात ठेवल्यासारखं वागू नये!" ही ओळ केवळ एक सल्ला नाही, तर आजच्या समाजातील वास्तवावर मार्मिक भाष्य आहे. पूर्वी एकत्र बसलेली माणसं संवाद साधायची, हसत-खेळत आपल्या भावना शेअर करायची. पण आज एकाच




खोलीत बसलेली माणसं एकमेकांपासून दूर आहेत – कारण प्रत्येकाच्या हातात मोबाईल आहे आणि डोळे स्क्रीनमध्ये आहेत. मोबाईलचा वापर गरजेपुरता असावा, गरज नसताना संवादात खंड टाकणारा ठरू नये. जिवंत नात्यांना आभासी दुनियेच्या आड यायला नको. एखाद्याचा चेहरा समोर असताना, त्याच्याशी मनापासून संवाद साधणं हेच खरं माणूसपण आहे. आजच्या पिढीने मोबाईलचा समतोल वापर करून, खरी नाती आणि माणुसकी जपणं गरजेचं आहे. मोबाईलच्या सवयीमुळे आपलं माणूसपण हरवू नये, हे लक्षात ठेवणं काळाची गरज आहे.

## वोदय क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धा

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:**
**-जितेंद्र खोडे**

**राळेगाव** :-नवोदय क्रीडा मंडळ राळेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धा बाळासाहेब मांगुळकर (आमदार यवतमाळ विधानसभा), अध्यक्ष वसंतराव पुरके (माजी शिक्षणमंत्री), उपस्थित मान्यवर अरविंद वाढोणकर, राजू तेलंगे, मिलिंद इंगोले, राजू दुधपोहळे, शशांक केंढे, पवन छोरिया, अंकुश मुनेश्वर,बाळू धुमाळ, प्रदीप ठुणे, दिलीप दूधगीकर, सचिन उरकुंडे,अफसर लियाकत, किशोर धामंदे, विजय झाडे,महेश भोयर, गजु पाल, ताठे, बहाळे, व मंडळाचे सर्व सदस्य, मान्यवरांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय सामन्याचा उदघाटन सोहळा संपन्न झाला.



## निंबोडी गावात जय भवानी माता पॅनलचा जोरदार प्रचार

### महिलांची उपस्थित लक्षणीय

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

श्री छत्रपती कारखान्याच्या निवडणुकीसाठी जय भवानीमात पॅनलचे प्रमुख व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार,क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे व पॅनल प्रमुख पृथ्वीराज जाचक यांच्या नेतृत्वाखाली सणसर गटातील उमेदवार शिवाजीराव निंबाळकर,रामचंद्र निंबाळकर,सुचिता सपकळ यांच्या प्रचारासाठी जय भवानी माता पॅनलच्या कार्यकर्ते यांनी निंबोडी गावात घर टू घर जाऊन पत्रक देऊन प्रचार केला असून निंबोडी गावातील लोकांचा उत्सपूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून आले.प्रचारा करण्यासाठी महिलांची संख्या सुद्धा लक्षणीय दिसत होती. उमेदवार शिवाजीराव निंबाळकर,सुचिता सपकळ, रामचंद्र निंबाळकर,सचिन सपकळ,प्रशांत निंबाळकर,अमोल भोईटे रोहित निंबाळकर जैनुद्दीन कबीर तुषार सपकळ कुंदन सपकळ सागर जाधव रोहित पाटील शुभम सपकळ अक्षय निंबाळकर अभिजित निंबाळकर,शैलेश सपकळ आदी कार्यकर्ते परिसरातील सभासद उपस्थित होते.



# विदर्भातील पहिला "बलून बंधारा" निर्माण होणार गोंदियातील बाघ नदीवर, १०९ कोटी रुपये मंजूर

**आमदार विनोद अग्रवाल यांच्या प्रयत्नांमुळे रजेगाव-काटी उपसा सिंचन योजनेला मिळणार नवे जीवन, १० हजार एकर जमीन होणार सिंचनाखाली**

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड गोंदिया**
**गोंदिया. (११ मे)**

महाराष्ट्राच्या शेवटच्या टोकावर असलेल्या गोंदिया जिल्ह्यातील नदीचे पाणी अडविण्यासाठी आणि हे पाणी सिंचनासाठी वापरण्यासाठी, आमदार विनोद अग्रवाल यांच्या प्रयत्नातून रजेगाव येथे बाघ नदीवर नवीन प्रकारचा बलून धरण बांधण्यात येणार आहे. यासाठी आमदार विनोद अग्रवाल यांनी सरकारला केली विनंती वरुन जलसंपदा विभागाकडून १०९ कोटी रुपये मंजूर झाले आहे. अमेरिका आणि चीनच्या तंत्रज्ञानावर आधारित, गोंदिया तहसीलमधील रजेगाव बाघ नदीवर हा बलून बंधारा बांधला जाणार आहे ज्यामुळे रजेगाव-काटी उपसा सिंचन योजनेला नवीन जीवन मिळेल. भारतात, जळगावमधील गिरणा नदीवर प्रथम प्रायोगिक तत्वावर बलून बैराज



बांधण्यात आले, त्यानंतर ते अनेक नद्यांवर बांधण्यात आले, परंतु विदर्भातील गोंदिया जिल्ह्यात ते पहिल्यांदाच बांधले जात आहे. आमदार विनोद अग्रवाल म्हणाले की, अनेक वर्षापूर्वी रजेगाव-काटी उपसा सिंचन योजना करण्यात आली होती परंतु पाणी साठवणुकीअभावी ही योजना बंद अवस्थेत पडून आहे आणि आतापर्यंत ती सिंचनासाठी वापरता आलेली नाही. परंतु आम्ही वारंवार सरकारला रजेगाव बाघ नदीवर बंधारा बांधण्याची विनंती केली, ज्यासाठी सरकारने आम्हाला १०९ कोटी रुपये खर्चाचा बलून धरण दिले आहे. आमदार विनोद अग्रवाल पुढे म्हणाले, हे बलून बॅरेज अमेरिका आणि चीनच्या तंत्रज्ञानावर आधारित आहे. हे धरण हवेच्या दाबाने स्वयंचलितपणे चालेल आणि ते बलून सेन्सर तंत्रज्ञानाने काम करेल. ते बुलेटप्रूफ असेल आणि तळाशी असलेल्या पातळीपर्यंत ३ मीटर पाणी साठवेल. ते पुढे म्हणाले, २५ ते ४० फूट वाळू उरल्यानंतर, त्याखाली सिमेंट काँक्रीट टाकले जाईल ज्यावर ते उभे राहील. बलून धरणातील पाणी साचल्याने सुमारे १० हजार एकर सिंचन क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. हे काम लवकरच सुरू करण्याबाबत विदर्भ पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांकडून योग्य मार्गदर्शक तत्त्वे जारी केली जातील. आमदार विनोद अग्रवाल यांच्या प्रयत्नांमुळे, 395 कोटी रुपये खर्चाचा महत्त्वाकांक्षी डांगोर्ली बॅरेज मंजूर करण्यात आला हे उल्लेखनीय आहे. वैनगंगा नदीवरील ३९५ कोटी रुपयांच्या प्रकल्पाला नुकतीच मंजुरी देण्यात आली आहे, ज्याचे काम देखील सुरुवातीच्या टप्प्यात आहे. नदीतील पाणी थांबवल्याने ग्रामीण भाग आणि शहरांना २४ तास शुद्ध पिण्याचे पाणी मिळेल, तर सुमारे ५८६१ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा फायदा होईल. येत्या काळात, गोंदिया तहसील पाण्याच्या टंचाईपासून मुक्त होईल आणि शेते आणि कोठारे हिरवीगार होतील असे विश्वास आमदार विनोद अग्रवाल यांनी व्यक्त केले.

# प्रेमसंबंध तोडण्यासाठी मांत्रिकाची मदत; विहिरीत 'मंतरलेल्या' विटा टाकल्याचा प्रकार ; रेवदंडा परिसरात खळबळ

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

प्रेमसंबंध तोडण्यासाठी मांत्रिकाची मदत; विहिरीत 'मंतरलेल्या' विटा टाकल्याचा प्रकार ; रेवदंडा परिसरात खळबळ रेवदंडा पोलिस स्टेशन हद्दीतील ताडगाव येथे रविवारी एका विचित्र प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये खळबळ उडाली. एका पती-पत्नीने विहिरीत 'मंत्रवाटलेल्या' विटा टाकल्याचे उघड झाल्यानंतर ग्रामस्थांनी विषप्रयोगाचा संशय व्यक्त केला आणि पोलिसात तक्रार दाखल केली. याप्रकरणी रेवदंडा पोलिसांनी संबंधित दाम्पत्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.नवी मुंबईतील सीवूड्स दारावे येथे राहणारे अखलाक अयुब खान (४७) आणि रेश्मा अखलाक खान (४७) हे दाम्पत्य आपल्या मेहुणीच्या लग्नासाठी मुरुड तालुक्यातील चोरढे येथे आले होते. लग्नानिमित्त ते रेवदंडा येथे पोहोचले आणि भाड्याने रिक्षा घेऊन साळाव ते चोरढे दरम्यानच्या विहिरींमध्ये काही वीटा टाकू लागले. ताडगाव येथे ग्रामस्थांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी त्यांना थांबवून चौकशी केली.प्राथमिक चौकशीत, खान दाम्पत्याने सांगितले की



त्यांची मुलगी सादिया हिचे पाच वर्षांपासून एका युवकाशी प्रेमसंबंध होते, जे त्यांना मान्य नव्हते. या संबंधांपासून मुलीला दूर करण्यासाठी त्यांनी कल्याण येथील एका मांत्रिकाचा सल्ला घेतला. त्या मांत्रिकाने 'मंत्रवाटलेल्या' २१ विटा दिल्या होत्या, ज्या २१ विहिरींमध्ये टाकण्यास सांगण्यात आले होते. विहिरीत विष टाकल्याचा संशय निर्माण झाल्याने परिसरात तणाव निर्माण झाला होता. ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने रेवदंडा पोलीस ठाण्याबाहेर जमून याचे स्पष्टीकरण मागितले. भाजपचे जिल्हा चिटणीस महेश मोहिते, कोर्लई सरपंच राजश्री मिसाळ यांच्यासह अनेक ग्रामस्थांनी याची चौकशी करण्याची मागणी केली.पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत खान दाम्पत्याला ताब्यात घेतले. ग्रामस्थांची समजूत काढण्यासाठी रेवदंडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरवले यांनी खुद्द विहिरीतील पाणी पिऊन दाखवले. खान दाम्पत्यालाही पाणी पिण्यास सांगण्यात आले. त्यामुळे विषप्रयोगाचा संभ्रम दूर झाला. या प्रकारात अंधश्रद्धेला खतपाणी घालण्यात आल्याने आणि समाजात भीती पसरल्याने रेवदंडा पोलिसांनी मांत्रिकाच्या सांगण्यावरून विटा टाकल्याबद्दल दाम्पत्याविरोधात गुन्हा नोंदवला आहे. अधिक तपास सुरु आहे.
रेवदंडा पोलिस स्टेशन हद्दीतील ताडगाव येथे रविवारी एका विचित्र प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये खळबळ उडाली. एका पती-पत्नीने विहिरीत 'मंत्रवाटलेल्या' विटा टाकल्याचे उघड झाल्यानंतर ग्रामस्थांनी विषप्रयोगाचा संशय व्यक्त केला आणि पोलिसात तक्रार दाखल केली. याप्रकरणी रेवदंडा पोलिसांनी संबंधित दाम्पत्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.नवी मुंबईतील सीवूड्स दारावे येथे राहणारे अखलाक अयुब खान (४७) आणि रेश्मा अखलाक खान (४७) हे दाम्पत्य आपल्या मेहुणीच्या लग्नासाठी मुरुड तालुक्यातील चोरढे येथे आले होते. लग्नानिमित्त ते रेवदंडा येथे पोहोचले आणि भाड्याने रिक्षा घेऊन साळाव ते चोरढे दरम्यानच्या विहिरींमध्ये काही वीटा टाकू लागले. ताडगाव येथे ग्रामस्थांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी त्यांना थांबवून चौकशी केली.प्राथमिक चौकशीत, खान दाम्पत्याने सांगितले की त्यांची मुलगी सादिया हिचे पाच वर्षांपासून एका युवकाशी प्रेमसंबंध होते, जे त्यांना मान्य नव्हते. या संबंधांपासून मुलीला दूर करण्यासाठी त्यांनी कल्याण येथील एका मांत्रिकाचा सल्ला घेतला. त्या मांत्रिकाने 'मंत्रवाटलेल्या' २१ विटा दिल्या होत्या, ज्या २१ विहिरींमध्ये टाकण्यास सांगण्यात आले होते.
विहिरीत विष टाकल्याचा संशय निर्माण झाल्याने परिसरात तणाव निर्माण झाला होता. ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने रेवदंडा पोलीस ठाण्याबाहेर जमून याचे स्पष्टीकरण मागितले. भाजपचे जिल्हा चिटणीस महेश मोहिते, कोर्लई सरपंच राजश्री मिसाळ यांच्यासह अनेक ग्रामस्थांनी याची चौकशी करण्याची मागणी केली.पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत खान दाम्पत्याला ताब्यात घेतले. ग्रामस्थांची समजूत काढण्यासाठी रेवदंडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरवले यांनी खुद्द विहिरीतील पाणी पिऊन दाखवले. खान दाम्पत्यालाही पाणी पिण्यास सांगण्यात आले. त्यामुळे विषप्रयोगाचा संभ्रम दूर झाला.
या प्रकारात अंधश्रद्धेला खतपाणी घालण्यात आल्याने आणि समाजात भीती पसरल्याने रेवदंडा पोलिसांनी मांत्रिकाच्या सांगण्यावरून विटा टाकल्याबद्दल दाम्पत्याविरोधात गुन्हा नोंदवला आहे. अधिक तपास सुरु आहे.

# पाटोद्यात बुद्ध जयंती निमित्त शांतता, समता आणि करुणेचा जागर

### भीमनगर बुद्ध विहारात पंचशील ध्वजारोहण, शांततेत मिरवणूक व सामूहिक पूजापाठाचे आयोजन...

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -** "जगाला जर शांतता हवी असेल तर बुद्धाचे तत्व स्विकारावे लागतील... युद्धाने कटूता वाढते तर बुद्धाने प्रेम वाढते, या विचारांचा जागर करत भगवान गौतम बुद्ध यांची जयंती पाटोदा शहरात अत्यंत शांततेत, भक्तिभावाने आणि सामाजिक सलोख्याने साजरी करण्यात आली. या निमित्ताने भीमनगर येथील बुद्ध विहारात सकाळी पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. पंचशील ध्वज हा समतेचा, शांततेचा आणि करुणेचा प्रतीक असून, याच्या माध्यमातून तथागतांच्या शिकवणीचा प्रसार करण्यात आला. ध्वजारोहणानंतर विहारात भगवान बुद्धांच्या प्रतिमेची विधीवत पूजा पार पडली. या नंतर बुद्ध मूर्तीची भव्य शांततेत मिरवणूक पाटोदा शहरातून काढण्यात आली. मिरवणुकीत विविध वयोगटातील बौद्ध अनुयायी, महिला, तरुण, बालगोपाळ यांनी सहभाग घेतला. डोक्यावर पंचशील ध्वज, हातात घोषवाक्यांचे फलक आणि डॉल-ताशांच्या गजरात मिरवणूक शहरातून मार्गस्थ झाली. "जय भीम" च्या घोषणांनी शहराचे वातावरण भारावून गेले होते. शहरातील नागरिकांनी मिरवणुकीचे विविध ठिकाणी



उत्स्फूर्त स्वागत केले. या शिस्तबद्ध व शांततेत पार पडलेल्या मिरवणुकीमुळे बौद्ध अनुयायांचे संघटन, संस्कृतीप्रेम आणि सामाजिक बांधिलकी अधोरेखित झाली. मिरवणुकीनंतर बुद्ध विहारात सामूहिक पूजापाठ पार पडला. विशेष पूजेनंतर सर्व उपस्थित भाविकांसाठी भोजनदानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी स्थानिक कार्यकर्त्यांनी संयोजन केले. बुद्ध पौर्णिमा हा केवळ धार्मिक उत्सव नसून, तो समतेचा, करुणेचा आणि शांततेचा जागर करणारा दिवस आहे. या निमित्ताने पाटोदा शहराने तथागतांच्या विचारांचा प्रसार करत अनुकरणीय आदर्श घालून दिला.

## निवडक

### धरणात बुडून एकाचा मृत्यू

**कर्जत :** नवी मुंबई येथील दिघा गावातील वसाहतीत राहणारे अजय विष्णू रावत (२८) हे आपल्या चार मित्रांसह कर्जत तालुक्यातील पाषाणे येथे नातेवाईक यांच्याकडे आले होते. भोजन करून अंघोळीसाठी जवळील लघुपाटबंधारे प्रकल्प असलेल्या धरणावर गेले असता अजय रावतला पाण्याचा अंदाज न आल्याने त्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना शनिवारी घडली. सकाळी नऊ वाजता त्या तरुणाचा मृतदेह बाहेर काढण्यात यश आले. संबंधित तरुणाच्या मृत्यूची नोंद नेरळ पोलीस ठाणे येथे आकस्मीक मृत्यू अशी करण्यात आली असून अधिक तपास पोलीस हवालदार लोखंडे करीत आहेत.

### दोन तासांत १६० गाड्यांवर कारवाई

**उल्हासनगर :** उल्हासनगरच्या मध्यवर्ती भागातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते शांतीनगरदरम्यान वाहनचालकांनी नियम पाळावेत म्हणून वाहतूक पोलिसांनी अवघ्या दोन तासांत १६० गाड्यांवर दंडात्मक कारवाई करत तब्बल १.२५ लाख रुपयांचा दंड आकारला. ही धडक मोहीम शहरात मोठ्या चर्चेचा विषय ठरत असून व्यापाऱ्यांपासून ग्राहकांपर्यंत सर्वांमध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.उल्हासनगर शहरातील वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या आणि नियम मोडणाऱ्या वाहनचालकांवर अंकुश ठेवण्यासाठी उल्हासनगर वाहतूक पोलिसांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुखदेव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एक विशेष मोहीम राबवली. शिवाजी चौक ते शांतीनगर गेट दरम्यान दोन तासांच्या या मोहिमेत १६० वाहनांवर कारवाई करत तब्बल १ लाख २५ हजार रुपयांचा ऑनलाइन दंड वसूल करण्यात आला.

### महसूल विभागातर्फे शिबिराचे आयोजन

**मुरूड-जंजिरा :** मुरूड तालुक्यातील नांदगावमध्ये येत्या बुधवार दि. १४ मे रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. येथील श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर विद्यालयात सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत होणाऱ्या या शिबिरात आधार कार्ड नोंदणी, रेशनकार्ड, उत्पन्न दाखले, सातबारा मोहीम राबवली जाणार आहे. सामाजिक लाभाच्या योजना जसे संजय गांधी निराधार योजना, पीएम किसान योजना अशा महसूल विभागाशी संबंधित दाखल्यांचे वाटप, जनतेच्या तक्रारीबाबत शंका निरसन आदी कामे शिबिरात केली जाणार आहेत.

# फणसाड अभयारण्यात आज होणार प्राण्यांची गणना

## फणसाड प्रशासनाकडून सर्व तयारी पूर्ण

**मुरूड-जंजिरा :** मुरूड तालुक्यातील सुमारे ५४ चौरस किलोमीटर क्षेत्रामध्ये फणसाड अभयारण्य पसरलेले आहे. या अभयारण्यात पशू-पक्षी व वन्यजीव यांची मोठी संख्या आहे. सोमवारी दिनांक १२ मे रोजी बुद्ध पौर्णिमा असल्याने प्रखर अशा चंद्र प्रकाशामध्ये वन्यजीवांची गणना करण्यात येणार आहे. दरवर्षी प्रत्येक अभयारण्यात बुद्ध पौर्णिमानिमित्ताने वन्यजीवांची गणना केली जाते. कारण बुद्ध पौर्णिमेस चंद्र प्रकाश प्रखर असल्यामुळे गणना करण्यासाठी त्याची मदत होते. दिनांक १२ व १३ मेपर्यंत वन्यजीवांची गणना करण्यात येणार आहे.

बुद्ध पौर्णिमेच्या संध्याकाळी फणसाड अभयारण्यामधील सर्व कर्मचारी वृंद व वन्यजीव प्रेमी नागरिक यांच्या मदतीने ही गणना केली जाणार असल्याची माहिती फणसाड अभयारण्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी नितीन ढगे यांनी दिली आहे.

गणनेसाठी ट्रॅप कॅमेऱ्याची मदत सुद्धा होणार असल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली. गणना मोहीम यशस्वी होण्यासाठी फणसाड अभयारण्यातील वनपाल आदेश पोकळ, अरुण पाटील, संतोष पिंगळा, सुनील जाधव हे अथक परिश्रम घेत आहेत.

### सात मचाणांची उभारणी

वन्यजीवांची गणना करण्यासाठी झाडाच्या उंच ठिकाणी सात मचाण बांधण्यात आलेले आहेत. फणसाड अभयारण्यात पाण्याचे २७ स्त्रोत असून जिथे वन्यजीव पाणी पिण्यास येतात, अशा ठिकाणी मचाण व अन्य व्यवस्था करण्यात आली आहे. बुद्ध पौर्णिमेच्या सायंकाळच्या दरम्यान सर्व पथके घनदाट जंगलात गणनेच्या कामाची सुरुवात करणार आहेत.



### ११७ विविध पक्षांच्या जाती

या अभयारण्यात रान गवे, बिबट्या, सांबर, भेकर, रान डुक्कर, शेकरू, पिसोरी, ससा, रान कुत्रे असे विविध वन्यजीव त्याचप्रमाणे ११७ विविध पक्षांच्या जाती आढळतात. त्याचप्रमाणे विविध रंगीबेरंगी फुलपाखरे या अभयारण्याची शोभा वाढवतात. फणसाड अभयारण्य हे नवाब कालीन संरक्षित वन क्षेत्र आहे. येथे उंच उंच झाडे व मोठ्या प्रमाणात पाऊस कोसळत असतो. विविध औषधी वनस्पती देखील मोठ्या प्रमाणात आढळून येतात.

# मौलाना आझाद उद्यानातच विविध प्रकल्पांचा उपक्रम

■ मनपा उपायुक्त व उद्यान विभाग प्रमुखांची पाहणी ■ दोन कर्मचाऱ्यांवर कारवाई

**सुमित घरत/ भिवंडी**

भिवंडी महानगरपालिकेत प्रशासकीय राज्य सुरू झाल्यापासून पालिकेच्या काही विभाग प्रमुख अधिकाऱ्यांनी मनमानी कारभार सुरू केल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. कायदे धाब्यावर बसवून मौलाना अबुल कलाम आझाद उद्यान या उद्यानात विविध प्रकल्प आणि उपक्रम सुरू करण्याचा घाट पालिका प्रशासनाने घातला आहे. त्यापैकी पाण्याची टाकी बांधण्यासाठी परिसरातील नागरिकांनी हरकत घेऊन ठेकेदाराने केलेला खड्डा पालिकेमार्फत बंद केला. मात्र या उद्यानात दवाखान्यासाठी ठेवलेली केबिन न उचलल्याने नागरिकांमध्ये असंतोष पसरला आहे.



> महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने सुरू केलेल्या कामाची माहिती उद्यान विभाग प्रमुखास माहिती न देणाऱ्या मौलाना आझाद उद्यानातील दोन कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी उपायुक्त बाळकृष्ण क्षीरसागर यांनी सांगितल्यानुसार प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठविला असून कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या उद्यानात योजलेल्या उपक्रमाची माहिती संबंधित विभागाने कळविली नाही.
> 
> - **निलेश संखे**, भिवंडी महापालिका,उद्यान विभाग प्रमुख

सध्या स्थितीत सुरू असलेल्या लहान मुलांच्या खेळण्याच्या या जुन्या मैदानासाठी आजतागायत पालिकेने कोट्यवधी रुपये खर्च करून या मध्यवर्ती भागातील पर्यावरणाचा समतोल साधला होता. मात्र लहान मुलांच्या या खेळाच्या मैदानात पालिकेने सुरू केलेल्या कामाबाबत तक्रारी वाढल्याने वस्तुस्थितीची पाहणी करण्याकरिता भिवंडी मनपाचे उपायुक्त बाळकृष्ण क्षीरसागर यांनी उद्यान विभाग प्रमुख निलेश संखे यांच्यासह भेट दिली. भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ५ मध्ये पालिकेच्या विविध योजना राबविण्यासाठी आरक्षित जागा आहेत तर अनेक ठिकाणी मोकळ्या खासगी जागा आहेत. त्याकडे लक्ष न देता पालिकेचे काही विभाग प्रमुख अधिकाऱ्यांनी मौलाना अबुल कलाम आझाद उद्यानाला लक्ष्य केले आहे. मौलाना अबुल कलाम आझाद उद्यान हे फार जुने उद्यान असून या उद्यानात सायंकाळी लहान मुले खेळण्यासाठी जमतात. तर महिला देखील लहान मुलांना घेऊन येत असतात. त्याचप्रमाणे या उद्यानातील झाडे मध्यवर्ती भागातील पर्यावरणाचा समतोल राखतात. याठिकाणी आरोग्य केंद्र देखील सुरू करण्याचे प्रस्तावित असल्याची माहिती पालिकेच्या सूत्राने दिली असून त्यासाठी उद्यानात मागील आठवड्यात कंटेनरची केबिन ठेवली आहे. या सर्व उपक्रमाची माहिती उद्यान विभाग प्रमुख निलेश संखे यांना माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले. सदर उद्यानात मनपाच्या कामासाठी पूर्वसूचना न देता होणाऱ्या अतिक्रमणाची माहिती मिळाल्यानंतर पालिकेचे उपायुक्त बाळकृष्ण क्षीरसागर आणि उद्यान विभाग प्रमुख निलेश संखे यांनी घटनास्थळी भेट देऊन उद्यानाची माहिती घेतली. विभागाच्या परवानगीशिवाय केलेली सर्व कामे रद्द करताना क्षीरसागर यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

# सिडकोत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसाठी पैशांची मागणी?

■ व्हॉट्सॲप मेसेजमुळे सिडकोत खळबळ
■ व्यवस्थापनाकडून चौकशी सुरू
■ अधिकारी-कर्मचारी चौकशीच्या फेऱ्यात

**नवी मुंबई :** सिडकोतील मलईदार विभागात बदलीसाठी कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून प्रत्येकी दोन ते अडीच लाख रुपयांची मागणी केली जात असल्याचा मेसेज सिडकोतील अ धिक ा रा ी- क र्म चा ऱ्या ंच्य ा व्हॉट्सॲप ग्रुपवर व्हायरल झाल्यामुळे सिडकोतील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बदल्या वादात सापडल्या आहेत. या व्हायरल मेसेजमध्ये पैसे घेणाऱ्या अथवा देणाऱ्या व्यक्तीचे नाव नसले तरी देखील या मेसेजची व्यवस्थापनाने दखल घेतली असून चौकशी केली जात असल्याचे सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक -१ राजा दयानिधी यांनी सांगितले.

दरम्यान, अशा प्रकारच्या कुठल्याही मेसेजला कर्मचाऱ्यांनी बळी न पडता ज्या कर्मचाऱ्यांकडे अशा प्रकारची डिमांड कोणी केली असेल तर त्यांनी थेट आपल्याशी संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. काही दिवसांपूर्वी नवी मुंबई महापालिकेतील १२ कनिष्ठ अभियंत्यांना देण्यात आलेल्या पदोन्नतीत पैसे घेतल्याचा आरोप प्रशासनावर करण्यात आला होता. सदर आरोपाची चौकशी करण्यासाठी महापालिका आयुक्त कैलास शिंदे यांनी कनिष्ठ अभियंत्यांच्या पदोन्नतीला स्थगिती देत अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांची या प्रकरणाच्या चौकशीसाठी समिती गठित केली होती.

एकीकडे नवी मुंबई महापालिकेत कनिष्ठ अभियंत्यांच्या पदोन्नतीत पैसे घेतल्याचा मेसेज सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर आता सिडकोतील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमध्ये देखील पैशांची डिमांड केली जात असल्याचा मेसेज व्हायरल झाला आहे. विशेष म्हणजे साडेबारा टक्के योजना विभागात काम करणाऱ्या एका कार्यालयीन सहाय्यकाद्वारे कंत्राटी कर्मचाऱ्यांकडे फोन करून पैशांची डिमांड केली जात असल्याचा मेसेज सिडको अ धिक ा रा ी- क र्म चा ऱ्या ंच्य ा व्हॉट्सॲप ग्रुपवर फिरू लागल्याने सिडको वर्तुळात कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बदल्या चर्चेचा विषय झाला आहे. दरम्यान, या व्हायरल मेसेजबाबत सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी यांच्याकडे देखील काही कर्मचाऱ्यांनी तक्रार नमूद केली आहे. त्यामुळे दक्षता विभागाकडून देखील या व्हायरल मेसेजप्रकरणी चौकशी सुरू झाली आहे.

### सिडकोतील मलईदार खाती मिळण्यासाठी चढाओढ

सिडकोतील इस्टेट विभागासह साडेबारा टक्के योजना विभाग, साडेबावीस टक्के योजना विभाग (भूसंपादन), अतिक्रमण नियंत्रण विभागात (सीयूसी) आपली नेमणूक व्हावी म्हणून सिडकोतील अधिकारी-कर्मचारीवर्गामध्ये नेहमीच चढाओढ लागलेली असते. कारण हे विभाग सिडकोतील मलईदार विभाग म्हणून ओळखले जातात. त्यामुळे या विभागात नेमणूक होण्यासाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांची पैसे मोजण्याची देखील तयारी असते. परिणामी बदली व पदोन्नती संदर्भात कार्मिक विभागातील अधिकारी- कर्मचाऱ्यांकडून याच गोष्टीचा फायदा घेतला जात असल्याची चर्चा सिडकोत रंगली आहे.

# अंबा नदीत 18 वर्षीय परप्रांतीय तरुणाचा बुडून मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

– येथील पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वाकण येथील अंबा नदीत रविवार 11 मे रोजी दुपारच्या सुमारास आंघोळीला गेलेला अभिषेककुमार अवधेश राय हा वय 18 वर्षीय परप्रांतीय तरुणाचे पाण्यात बुडाल्याने निधन झाले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार अभिषेककुमार राय रा. उत्तरी धमौन, पो.धमौन, ता. पटोरी, जि. समस्तीपुर,राज्य बिहार (सध्या राहणार रा. आंगरआळी नागोठणे) हा रविवार 11 मे रोजी दुपारी 12.45 वा.च्या सुमारास पाटणसई गावाच्या हद्दीतील वाकण येथील अंबा नदीवर आंघोळीसाठी गेला असता; नदीतील पाण्याचा अंदाज न आल्याने त्याचा नदीत बुडून श्वास गुदमरून मृत्यू झाला. सदरील घटनेची नोंद नागोठणे पोलिस ठाण्यात झाली असून पुढील तपास सहा.पो.नि.सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलिस करीत आहेत.



# करंजा बंदरात दोन एलईडी मासेमारी बोटींवर कारवाई

**उरण :** करंजा बंदर परिसरात मत्स्यव्यवसाय विभागाच्या परवाना अधिकाऱ्यांनी शुक्रवारी सकाळी छापा टाकत दोन एलईडी मासेमारी बोटींवर कारवाई केली. केंद्र व राज्य सरकारने एलईडी पद्धतीने मासेमारी करण्यास बंदी घातलेली असतानाही या तंत्राचा वापर करीत खोल समुद्रात मासेमारी केली जात आहे.



> करंजा बंदर परिसरात एलइडी मासेमारी करणारे साहित्य असणाऱ्या करंजा आणि पेण तालुक्यातील दादर येथे प्रत्येकी एक अशा दोन बोटींवर कारवाई करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हा मत्स्यव्यवसाय उपायुक्त यांच्याकडे हा प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. यामध्ये बोटींना साडे पाच लाख रुपयांचा दंड आकारण्याची तरतूद आहे.
> 
> - **सुरेश बागुलगावे**, परवाना अधिकारी, उरण मत्स्यव्यवसाय विभाग

शुक्रवारी सकाळच्या सुमारास करंजा बंदरात गस्त घालत आसताना दोन एलईडी नौकेवर नौकेचे नाव व नौका नोंदणी नंबर नसल्याने विठ्ठल माऊली नौका, नौकामालक अनिल विठ्ठल जोशी यांच्या नौकेची तपासणी असता एक जनरेटर ३ फेज व पाण्यातील एलईडी बल्ब २००० वॅटचे दोन व पाण्यातील ४००० वॅटचे दोन बल्ब हे साहित्य आढळून आले. पंचासमक्ष हे चार एलईडी लाइट जप्त करण्यात आले. तसेच माऊली तुळजाई एकविरा या नौकेचे मालक श्निवृत्ती चिंतामणी पाटील यांच्या नौकेची तपासणी केली आसता त्यामध्ये एक जनरेटर ३ फेज, पाण्यातील लाइट-चार नग, इत्यादी सहाय्यक आयुक्त रायगड - अलिबाग यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करून नौका करंजा नवापाडा बंदरावर सुरक्षा रक्षकाच्या निगरानिखाली ठेवण्यात आली आहे.

# अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे संस्थापक अध्यक्ष बिंदू माधव जोशी यांच्या स्मृतिदिनानिमित्त सिल्लोड येथे अभिवादन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे संस्थापक अध्यक्ष बिंदू माधव जोशी (नाना) यांच्या स्मृतिदिनानिमित्त सिल्लोड येथे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.
शहरातील पंचायत समिती कार्यालयाच्या परिसरात शनिवार( दि.१०) रोजी ग्राहक पंचायतीचे सिल्लोड तालुका अध्यक्ष संजय कुलकर्णी यांचे प्रमुख उपस्थितीत हा अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी भाजपचे शहर मंडळ अध्यक्ष मनोज मोरेलू, माजी नगरसेवक विष्णू काटक,पत्रकार दत्तात्रय ढोरमारे, पत्रकार रवींद्र सोनवणे, मुख्याध्यापक रामचंद्र मोरे,गणेश दुतोंडे,जितेंद्र पाडवे, सुभाष साळवे, सतीश धांडे आदींची उपस्थिती होती.



# पैठण-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील मळेकरवाडीच्या घाटातील काम अखेर सुरू

## या चळवळीचे श्रेय कोणी घेऊ नये:- कॉ.महादेव नागरगोजे

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)-** पैठण-पंढरपूर या राष्ट्रीय महामार्गाचे रखडलेले काम उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सुरु झालेले आहे. कोणी ही फुकटचे श्रेय घेऊ नये असे कॉ.महादेव नागरगोजे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटलं आहे. दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, डिसेंबर २०२४ पुर्वी काम पुर्ण करण्या संदर्भात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने शपथपत्र दिले होते. तांत्रिक अडचणीमुळे कालावधी उलटून गेला आहे. याच महामार्गावर मळेकर वाडी घाटातील अंदाजे १ किलो मीटर रस्त्यांचे काम सुरू करण्यात आले आहे. पैठण-पंढरपूर या रखडलेल्या राष्ट्रीय महामार्गाचे काम गेल्या ७ वर्षांपासून जाणीवपूर्वक सडत ठेवण्याचा काम लोकप्रतिनिधीने केलेले आहे. या राष्ट्रीय महामार्गाचे काम लवकरात लवकर पुर्ण व्हावे या साठी भारतीय कम्युनिस्ट पक्ष व किसान सभेच्या नेतृत्वाखाली असंख्य चळवळी उदाहरण द्यायचे झाल्यास १६ मार्च २०२३ चुंबळी फाटा चक्काजाम आंदोलन, ०३ एप्रिल २०२३ रोजी पाटोदा तहसील कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन, १६ फेब्रुवारी २०२० उपविभागीय अधिकारी कार्यासमोर बेमुदत



धरणे आंदोलन, आदी असंख्य चळवळीत मोर्चे काढून शासनाचे दारे ठोठावली गेली. या राष्ट्रीय महामार्गावरील बरीचशी कामे मार्गी लावली असून चुंबळी फाट्यावरील चौफुलाचे काम पूर्ण केले गेले. बाकीच्या राष्ट्रीय महामार्गावरील रखडलेले काम मार्गी लावण्यासाठी कॉ.महादेव नागरगोजे(भा.क.प.), चक्रपाणी जाधव (शेतकरी नेते), ह.भ.प.रामकृष्ण रंधवे बापू महाराज यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. विधीतज्ञ नरसिंग जाधव यांनी उच्च न्यायालयासमोर वास्तुस्थितीची मांडणी केल्यानंतर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने न्यायालयात शपथपत्र देऊन डिसेंबर २०२४ पर्यंत काम पूर्ण करण्या संदर्भात शपथपत्र दिले होते. या वर ही काम सुरू न झाल्याने अवमान याचिका दाखल करण्यासंदर्भात विधीतज्ञ नरसिंह जाधव यांनी हालचाली सुरू केल्या होत्या. न्यायालयाच्या आदेशाने वन विभागाचे रस्ता बांधणी ना हरकत दिली होती. आता दि.०२ मे २०२५ रोजी घाटाच्या कामाला सुरुवात झाली आहे. या वर मा.खा.बजरंग बप्पा सोनवणे यांनी १८ मार्च २०२५ रोजी मुंबई येथे राष्ट्रीय प्राधिकरणाचे विभागीय अधिकारी प्रशांत हेगडे यांच्या कार्यालयात बैठक घेऊन डांबरीकरण करून रस्ता पूर्ण करण्याचा सूचना देण्यात आल्या. कृपया विनंती करतो की कोणी ही या कामाचे श्रेय लाटू नये या कामाचे सर्व श्रेय हे कॉ.महादेव नागरगोजे, चक्रपाणी जाधव, भाई विष्णुपंत घोलप, विधीतज्ञ नरसिंह जाधव, कॉ.भगवान जावळे, कॉ.सुदाम सिरसाठ, कॉ.भगवान पवळ, आत्माराम राख यांना जाते. असे प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

# पनवेल उपजिल्हा रुग्णालयात नर्सेस दिनानिमित्त विविध कार्यक्रम

## आद्यपरिचारिका फ्लॉरेन्स नायटिंगेल यांना अभिवादन







**दैनिक युवक आधार**
**पनवेल / प्रतिनिधी**

फ्लॉरेन्स नायटिंगेल यांचे कार्य खरोखरच प्रेरणादायी आहे. त्यांच्या पावलावर पाउल ठेवून रुग्णसेवेचा वसा आज नर्सेस कडुन उचलला जात आहे. रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा मानून हे कार्य असेच सुरु राहील असा सुर मान्यवरांनी व्यक्त केला. आद्यपरिचारिका फ्लॉरेन्स नायटिंगेल यांचा जन्मदिन सर्वत्र नर्सेस दिन म्हणून साजरा केला जातो. त्या निमित्ताने सोमवारी पनवेल येथील डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात विविध कार्यक्रम झाले. मान्यवरांच्या हस्ते प्लॉरेन्स नायटिंगेल यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर नेहा चव्हाण, स्वाती शिंदे यांनी नर्सेस दिनाचे महत्व आणि प्लॉरेन्स नायटिंगेल यांच्या कार्याविषयी माहिती सांगितली. नर्सेस दिनाच्या निमित्ताने उपजिल्हा रुग्णालयातील नर्सेस साठी दिवसभर विविध कार्यक्रम आणि स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी वैद्यकिय अधिक्षक डॉ. शिवाजी पाटील, डॉ. प्रसाद जठार, डॉ. प्रतिक म्हात्रे, डॉ. स्वाती नाईक, डॉ. सायली बेलगे, सहायक अधिसेविका ज्योती गुरव यांच्यासह कर्मचारी वर्ग, स्टाफ नर्सेस उपस्थित होते.